मंगळवार, ७ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१८९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●TUESDAY 07 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-189 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5



# कावळा शिवण्यापूर्वीच चितेजवळच्या नैवद्याने तो भागवतो भूक

आधुनिक केसरी न्यूज

**केवल जीवनतारे**

**नागपूर** : अंत्यसंस्कारानंतर अस्थी वेचण्यासाठी स्मशानभूमीत गेल्यानंतर दही -भातासह नैवेद्य मांडला जातो. स्मशानातल्या पत्र्याच्या शेडवर कावळे येण्यास सुरवात होते. त्यांच्या पंखांची फडफड होते त्यावेळी स्मशानातील शांत वातावरणाचा भंग होते. मात्र हा एक व्यक्ती कावळ्याला येऊ देत नाही. शांत झालेल्या चितेजवळ पोटातील भुकेच्या आगीचा डोंब उसळतो. सरणाजवळच्या नैवेद्यावर तो भुकेची आग शांत करतो. भुकेच्या असह्य वेदना सोसत ती भागविण्याच्या या भयावह दृश्याने काळजाचे पाणी पाणी होते. प्रेताच्या जागेवर ठेवलेल्या दही -भात, भजीचा नैवद्याला कावळ्याने चोच लावण्यापूर्वीच स्मशानातली गर्दी पांगू लागल्यानंतर हा व्यक्ती दररोज नैवद्याला शिवतो आणि भूक भागवतो. स्मशानभूमीतील घाटावरचे हे दृश्य बघितले की, हृदयातील काळजातून रक्ताचे कारंजे उडावेत असे मन चर्रर होते. भूक पहात नाही नैवेद्य कशाचा आहे. यामुळे हा व्यक्ती... पोटात भूक घेऊन आला. भयभित नजरेनं इकडे -तिकडे बघतो. सकाळच्या वेळी घाटावर रक्षा आणि अस्थी वेचण्यासाठी आलेल्या कुटुंबाकडून होत असलेला विधी पाहतो. पोटातील भुकेच्या आगीने व्याकूळ झाल्याने, थरथरत्या हाताने त्या व्यक्तीने दोन्ही हाताने पानावर वाढलेला दही-भाताचा नैवेद्य जवळ ओढला आणि अद्याशासारखा मटकावला. रक्षाविसर्जनाच्या वेळी किती नैवेद्य ठेवावा, हा ज्याच्या त्याच्या भावनेचा प्रश्न आहे. कावळा शिवला नाही तर स्मशानातले कर्मचारी नाइलाजास्तव हा नैवेद्य भरून कचऱ्यात टाकतात. परंतु हा व्यक्ती नैवेद्य मिळेल या आशेवर घाटावर येतो, जळून शांत झालेली चिता भूक शमवण्यासाठी या दुदैवी जीवाच्या कामी येत आहे.



**बघताच नजरेआड होतो . . .** स्मशानात प्रेत जाळातात त्या ठिकाणाहून नैवेद्य उचलून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचा प्रयत्न केला, तर पान हातून पडण्याची भीती . यामुळे त्याच ठिकाणी बसून तो खातो . कोणी आल्यास किलकिल्या नजरेने त्यांच्याकडे बघतो . मात्र पोटातील भूक त्याला स्वस्थ बसू देत नाही . थरथरत्या हाताने नैवेद्याचा उणा-पुरा घास अधाशासारखा खात बसलेला त्या व्यक्तीला कोणी दिसले की, आजूबाजूला लपतच स्वत :ला नजरेआड करण्याचा प्रयत्न करतो . त्यावेळी मन हेलावून जाते, अशा व्यक्तींना मदत करण्याचे काम हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड यांच्या सामाजिक कार्यामुळे भुकेच्या वेदना फोटोतून अनुभवण्याची संधी मिळाली . फोटो कुठला आहे हे मात्र कळले नाही .




# शेतकऱ्यांकडून कांद्याची होळी

## कांद्याला हमीभाव द्या; शेतकरी आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला : सध्या शेतकरी कांद्याचे भाव गडगडल्यामुळे संकटात सापडला असून सरकारी धोरणामुळे कांद्याचे भाव पडल्याचा आरोप विरोधकांसह शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे. सोमवारी होळीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयापुढे कांद्याची होळी पेटवली. 'सरकार समस्या काय सोडवणार, सरकारच एक समस्या' अशा घोषणा देऊन शेतकरी संघटनेने निषेध केला.**



केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांचा निषेध म्हणून शेतकरी संघटनेच्यावतीने आज होळीच्या दिवशी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कांद्याची होळी करण्यात आली. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे भाव वाढवण्याऐवजी भाव पाडण्याची मोहीमच केंद्र सरकारकडून राबवली जात आहे. त्याचाच फटका आज कांद्याला व इतर शेत मालाला बसला आहे. सरकारचे निर्यात धोरण याला कारणीभूत आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या मनमानी कारभारामुळे देशाने निर्यातीच्या बाबतीत पत गमावली. आता निर्यात खुली असली तरी कोणताही देश आपल्या देशावर विश्वास ठेवायला तयार नाही, त्याचा मोठा फटका देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला असल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला.कांदा माती मोल भावात विक्री करावा लागत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या मुला मुलींचे लग्न मोडलीत, मुलांचे शिक्षणे अर्ध्यावर सोडावी लागली आहेत. हे सर्व सरकारच्या चुकीच्या धोरणांचे परिणाम असल्याने शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली. सरकार विरोधात जोरदार घोषणा देऊन कांद्याची होळी करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे विलास ताथोड, अविनाश नाकट, डॉ. निलेश पाटील, बळीराम पांडव, शंकर कवर, अजय गावंडे, सतीश उंबरकर, मयूर जोशी, योगेश थोरात आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### दीड एकरवरील कांद्याची होळी

**नाशिक** : कांद्याला योग्य हमीभाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांवरती अक्षरश : कांद्याची होळी करण्याची वेळ आली आहे . येवला तालुक्यातल्या काही शेतकऱ्यांनी अकरा वाजता कांद्याची होळी केली . कांद्याचे पीक घ्यायला जितका खर्च आला आहे . तितका खर्चसुद्धा निघत नसल्यामुळे शेतकऱ्याने दीड एकरवरील कांद्याची होळी केल्याचे समोर आले आहे . नाशिक जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून कांद्याचा प्रश्न हा अत्यंत गंभीर होत चाललेला आहे शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव मिळत नाही . त्यामुळे शेतकरी आक्रमक झालेले असून कृष्णा डोंगरे या शेतकऱ्याने कांद्याची होळी पेटवलेली आहे . कृष्णा डोंगरे या शेतकऱ्याने कांद्याची होळी पेटवलेली आहे . या शेतकऱ्याने पंधरा दिवसांपूर्वी कांदा अग्निडाग समारंभ आयोजित केल्याची पत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाली होती . या समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देखील निमंत्रण देण्यात आले होते . अखेर आजच्या होळीच्या दिवशी सरकारच्या धोरणाला वैतागून या शेतकऱ्याने तब्बल दीड एकरावरील कांद्याला अग्निडाग दिला आहे . केंद्र आणि राज्य सरकारांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले आहे . शेतकऱ्यांचे जगणे सरकारला मान्य नाही . उत्पादकांनी कष्टाने पिकवलेला कांदा जाळून टाकला आहे . आजचा दिवस काळा दिवस आहे .

# बळीराजावर अस्मानी संकटांचा घाला !

## द्राक्षे पंढरी हादरली : मध्यरात्री अवकाळी पावसांची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

लखमापूर : दिंडोरी तालुक्यात सध्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाले असून मध्यरात्री अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने तालुक्यातील द्राक्षे पंढरी हादरली आहे. तोंडासी आलेला घास आता निसर्ग हिरावून नेतो की काय? या विवेचनेत बळीराजा सापडला आहे. एकीकडे आधीच शेतकरी वर्ग आर्थिक कोंडीत असतांना तसेच शेतात पिकविलेल्या शेती मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे अगोदरच शेतकरी मेटाकुटीला आलेला असतांना आता दुसरीकडे निसर्गाने ही बळीराजांला मोठा फटका देण्यास सुरुवात केली आहे. दोन




दिवसांपासून पावसाळी वातावरण तयार होऊन मध्यरात्री व सकाळी तालुक्यात विजांचा कडकडाट सह जोरदार पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याचे संकेत मिळत आहे. तालुक्यातील हस्ते, माळे, अंबानेर, पांडाणे, खेडगाव, जवळके, बोपेगाव, लखमापूर, इ.ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. याभागात अजून जवळपास ४० टक्के द्राक्षेबागा खुडण्याच्या बाकी आहे. या अवकाळी पावसाने द्राक्षे घडांना तडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पाऊस बरसल्याने शेतकरी वर्गाची मोठ्या प्रमाणावर धावपळ उडाली आहे. या अवकाळी पावसाने जोमात असलेल्या गहु, हरभरा, द्राक्षे, व इतर भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ लागले आहे. एकीकडे शेतात पिकवलेल्या एकाही शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. आणि दुसरीकडे पावसांचे आगमन यामुळे बळीराजा दुहेरी संकटात सापडला आहे. अवकाळी पाऊस बरसल्याने अनेक ठिकाणी बत्ती गुल झाली आहे. ग्रामीण भागात यांचा परिणाम दिसून येत आहे. अनेक ठिकाणी फळभाज्या, पालेभाज्या काढणीला आलेल्या असतांना अचानक पाऊस बरसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. हवामान विभागांकडून अजून पुढील दोन ते तीन दिवस या अवकाळी पावसांचे वातावरण राहाणार असल्यांचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाने आपल्या शेती मालाची काळजी घेणे गरजेचे आहे.



अजून तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी वर्गाच्या द्राक्षे बागा खुडण्याच्या बाकी असतांना आता तालुक्यात अवकाळी पावसांचे वातावरण तयार झाले आहे . अगोदरच शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर आर्थिक कोंडीत सापडला असतांना आता परत अस्मानी संकटांचा घाला शेतकरी वर्गावर झाला असल्याने शासनाने शेतकरी वर्गासाठी अशा संकटातून सावरण्यासाठी विशेष शेतीपूरक सवलत योजना निर्माण करावी . जेणे करून जगाचा पोशिंदा बळीराजांच्या डोळ्यातील अश्रु पुसले जातील .

संतोष रहेरे
(प्रगतशील शेतकरी .)




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# सवय...



आधुनिक केसरी

समोरच्या माणसाला एकदम तोडून बोलणे, क्षुल्लक गोष्टीवरून चिडून काहीतरी लागेल असे बोलणे. या गोष्टी घडून गेल्यावर करणाऱ्याला त्यांचा पश्चाताप होतो. पण नंतर काही उपयोग नसतो. त्याचा जो काही परिणाम व्हायचा असेल तो होऊन गेलेला असतो. म्हणून तर लहान मुलांना लहानपणापासून चांगल्या सवयी लागाव्या यासाठीआपण प्रयत्नशील असतो. कारण एकदा लागलेली सवय पुढे जन्मभर टिकते. सवय हे तसे पाहिले तर माणसाला मिळालेलं वरदान आहे.

कारण सवयीमुळेच आपण चांगली कौशल्ये शिकतो, नवीन गोष्टी शिकतो, आपले संरक्षण करायला शिकतो. चांगल्या सवयीमुळे माणूस घडतो. ' असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे. ' हे असाध्य सवयीमुळे साध्य होऊ शकते. हे जसे चांगल्या सवयींबद्दल, तसेच वाईट सवयीचं आहे. चांगल्या सवयी आयुष्याला वळण लावतात, तर वाईट सवयी आयुष्य बरबाद करतात. दुर्योधनाला धर्म म्हणजे काय आणि अधर्म म्हणजे काय हे कळत होते. पण तो म्हणतो की धर्माप्रमाणे वागणे चांगले हे मला कळते, पण मी ते स्वीकारू शकत नाही. आणि अधर्माने वागणे हे चुकीचे आहे हेही मला कळते पण मी ते सोडू शकत नाही. म्हणून जाणीवपूर्वक चांगल्या सवयी जोपासणे महत्वाचे आहे. चांगल्या सवयी अंगवळणी पडण्यासाठी वेळ लागतो, कष्ट पडतात. पण त्या हिताच्या असतात. वाईट सवयी लागायला वेळ लागत नाही. पण त्या व्यक्तीचे आणि समाजाचे सुद्धा नुकसान करतात. माणसाला चांगले काय आणि वाईट काय हे समजते. म्हणूनच चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. त्यावर आपले पुढचे आयुष्य अवलंबून असते.



## आनंदी पहाट

### शेंदूर फसलेला प्रत्येक दगड देव नसतो

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दिसलेल्या दगडाला शेंदूर फासून देव समजणाऱ्या आणि देवाच्या नावाखाली स्वतःचे खिसे भरणाऱ्या अशा अनेकांनी आपली नावं धनाढ्यांच्या यादीत नेहमीच वरच्या क्रमांकावर ठेवण्याचा जो चंग बांधलेला असतो, त्याची जाणीव आपल्यापैकी किती जणांना होत असते? माणसात देव न दिसणाऱ्या प्रत्येकालाच त्या दगडातला देव मात्र हमखास पावतो; का कसा कोणास ठाऊक? वयोवृद्धाला नतमस्तक होऊन त्यांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा घेण्यापेक्षा शेंदूर फासून एखाद्या झाडाखाली ठेवलेल्या दगडाच्या समोर मात्र जाता-येता डोकं आपटणारे संख्येनं कमी नाहीत. त्याच्या पुढ्यांत हजारो, लाखो रुपयाचं दान करणारे मात्र स्वतःच्या माता पितांच्या वृद्धार्पणात त्यांच्यासाठी शे-दोनशे देखील खर्च करू शकत नाहीत. त्यांच्या जाणीवा इतक्या संपलेल्या असतात कि जिथे दगडातल्या देवापेक्षा चालत्या-बोलत्या जन्मदात्या देवाचाच त्यांना विसर पडत असतो. दगडाला देव मानण्याच्या अंधश्रद्धेत अडकण्याच्या ऐवजी जन्मदात्यांमध्ये असलेलं देवत्व समजून घेऊन त्यांच्यावर श्रद्धा का ठेवू शकत नाहीत? आपल्या प्रत्येकालाच घरातल्या देव्हाऱ्यातील देवाचं अस्तित्व, महत्व, महात्म्य अगदी लहानपणापासून माहिती असतं, कमी अधिक प्रमाणात ते कळलेलं असतं. त्यामुळे आपल्या मनातील देव म्हणजे आपलं देवघर आणि जो देवघरांत असतो, दिसतो तो म्हणजेच देव. अशी आपली मनोधारणा असते, त्याची आपण केलेली ती देवाची व्याख्या असते. आपण देव नाही असं मानण्याची गरज नाही. पण कोणत्या कारणामुळे, कोणत्यावेळी, कोणत्या ठिकाणी त्या देवाचं दर्शन होईल, हे मात्र कोणालाच माहिती नसतं, सांगता येत नसतं. आपण नेहमीच दृश्य गोष्टींवर भरवसा ठेवत असतो, अशी वस्तू दिसल्यानंतरच आपण ती आहे असं म्हणत असतो, त्याचं अस्तित्व मान्य करत असतो.



आधुनिक केसरी

**नसावे अंतर | भजनात ||**
संसारी तापाने | तापलो श्रीरंगा ||
माझ्या पांडुरंगा | मार्ग दावा ||१||
वेदनेची गाथा | गवी तरी कोठे ||
केव्हा मज भेटे | इंद्रायणी? ||२||
गाथा-ज्ञानेश्वरी | नाही उघडली ||
म्हणोनिया झाली | दैना ऐशी ||३||
सदा मुखी एक | घ्यावे हरिनाम ||
त्यावीना आराम | नाही जीवा ||४||
सत्संगाची गोडी | लागो निरंतर ||
नसावे अंतर | भजनात ||५


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


त्रिपुरासुन्दरीं वन्दे संजीवनीं चतुर्भुजाम् ।
त्रिनेत्रां शिवजायां त्वां प्रसन्नां वरदां सदा ।।
संजीवनी, चतुर्भुजा, त्रिनेत्रा, श्रीशंकरपत्नी, सदैव प्रसन्न आणि वर देणारी असणाऱ्या त्रिपुरसुन्दरी देवीला, तुला मी वंदन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

काँच मन्दिर में श्वान जिमि, भूँकै छाया देख ।
केहरि कुप भ्रम से गिरै, निज छाया के पेख
।।१६४।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/१६४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद

: काचेच्या घरात बसलेला कुत्रा आपली छाया बघून भुंकत राहातो. सिंह विहीरीत आपले प्रतिबिंब बघून त्याला दुसरा सिंह समजतो आणि क्रोधावेगात येऊन अज्ञानाने त्या विहीरीत उडी मारतो. त्याच प्रमाणे आत्मा संसारातील माया जनित भोगांमध्ये, सुखाच्या भ्रांती द्वारे या मायाजालात अडकून अनेक दुःख, कष्टांना सहन करतो.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

संतांनी मानवीजीवनाचे सुक्ष्म निरीक्षण केले स्वतःच्या जीवनवर निर्भयपणे प्रयोग केले.आणि या जगातील जीवनाचास संपूर्ण अर्थ शोधून काढला. मित्रांनो, संतांचे अनुभवविश्व मोठे व्यापक आणि सर्वस्पर्शी असते. ते अति जिवंत ताजे व रसरशीत असते. संत स्वतः चे जीवनदर्शन ग्रंथामध्ये लिहितात. श्री सयर्थाचे म्हणणे असे आहे की ग्रंथाच्या बहिरंगापेक्षा त्याच्या अंतरंगास फार महत्व आहे. संतांचं अनुभव विश्व अफाट असते ते त्यांच्या जीवनात वरवरच्या देखणे पणाला किंमत नसते,तर अंतर्गत भावभावनेने ते अत्यंत सजड असते म्हणून तर संत मंडळींचे विचार हे युगानंयुगे ( अगदी अठ्ठावीस युगे )समाजमन जोडण्यासाठी कटीबध्द आहेत. संतांच्या विचारात अनंताला गवसणीं घालण्याचं सामर्थ्य असते. कल्पनेच्या भरारीला कोणीही अडवून ठेऊ शकत नाही. ग्रंथामधील शब्दांचा आधार घेऊन वाचक जर अतींद्रिय, अव्यय, अव्यक्त आणि अनंत सद्ववस्तूंच्या अनुभव क्षेत्रामध्ये शिरू शकला तर तो ग्रंथ समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पात्र ठरतो. तो खरा परिपूर्ण, परिपक्व, समाजाला दिशा दाखवणारा ग्रंथ समजावा. मी त्रांनो तुमचे काय किंवा माझे काय आपल्या सारख्या सामान्य माणसाचे जीवन स्वार्थी व अहंकारी अनेक अशुभ वासनांनी भरलेले आहे. तर श्रवणाने किंवा ग्रौथ सेवनाने आपल्या जीवनात अमुलाग्र बदल घडवण्याचं सामर्थ्य या ग्रंथराज दासबोधात आहे त्याची आपणं निरंतर पारायणं करू सदैव सदाचारात राहू. संतवाक्यावर सदैव विश्वास ठेऊ व आ पलं आयुष्य सुफल संपूर्ण करू.

## भक्त आणि परमात्मा एकरूपच असतात

आधुनिक केसरी

'आमच्या हातून वारंवार चुका होतात' असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आईबापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले की, 'तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस' तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान्, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल. एखादा मुलगा 'मी विहिरीत उडी घेणार' म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा तोंडात



मारून तिथून बाजूला काढायचे ? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधिग्रस्त असेना ! अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते, त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला 'मी' चा विसर पडत जातो. 'मी नसून तूच आहेस' ही भावना दृढ होत जाते. शेवटी 'मी' नाहीसा झाला की राम, कृष्ण, वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो. आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे की, 'भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.' यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही. **आजचे बोधवचन आहे -परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

माया तें चि ब्रम्ह ब्रम्ह तेंचि माया । अंग आणि छाया तया परी ॥१॥
तोडितां न तुटे सारितां निराळी । लोटांगणांतळीं हारपते ॥ध्रु.॥
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणिक ते आटी विचाराची ॥२॥
तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ॥३॥
दुर्जनासि करी साहे । तो ही दंड हे लाहे ॥१॥
शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥ध्रु.॥






# ज्येष्ठ पत्रकार संजीव उन्हाळेविरुद्ध गुन्हा दाखल

## शेतकऱ्यांनी भरलेले कर्ज परतफेडीचे पैसे हडपले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : शेतीविषयक कर्जपुरवठा करणाऱ्या कंपनीकडून १७२ शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी कर्ज मिळाल्यानंतर त्यानंतर कर्जदार शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीही केली. पण सदर रक्कम कंपनीत भरली नाही. याप्रकरणी कंपनीने एक वर्षापूर्वी न्यायालयात दाद मागितली या प्रकरणात ३७ लाख सहा हजार ५५५ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दिलासा जनविकास प्रतिष्ठान संचालकाविरोधात वेदांतनगर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त दीपक गिऱ्हे यांनी दिली.**



**शेतकरी पैसे भरत गेले, अन् 'दिलासा'ने ठेवले स्वत :कडेच :** 'नाफा'ने १७२ शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केल्यानंतर कर्जवसुलीची रक्कम 'दिलासा'ने 'नाफा'मध्ये जमा केली नाही . दरम्यान काही सुरवातीला १६ शेतकऱ्यांनी विहित वेळेत सात लाख ४२ हजार ४११ आणि इतर ७९ शेतकऱ्यांनी कर्ज परतफेड करून उन्हाळे यांच्याकडे २९ लाख ६४ हजार १४४ रुपये जमा केल्याची माहिती 'नाफा'ला मिळाली, तसेच कर्जापोटी पैसे जमा केल्याच्या पावत्याही शेतकऱ्यांनी 'नाफा'ला दिल्या . एकूण ९५ शेतकऱ्यांकडून जमा केलेले ३७ लाख सहा हजार ५५५ रुपये कंपनीकडे जमा न करता फसवणूक केल्याप्रकरणी 'नाफा'कडून कोर्टात धाव घेण्यात आली होती, न्यायालयाकडून घटनेची शहानिशा करण्यात येऊन न्यायालयाने वेदांतनगर पोलिसांना फसवणुकीचा गुन्हा दाखल करून घेण्याचे आदेश १४ फेब्रुवारी २०२३ रोजी दिले . त्यानुसार संजीव उन्हाळे यांच्याविरोधात चार मार्च रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला . अधिक तपास उपनिरीक्षक उत्रेश्वर मुंडे करत आहेत .

या प्रकरणात भांडण असे आहे की, दिलासाने त्यांना ७० लाख रु .चेकने दिले व ३०लाख रु .सबसिडी दिली . नाफाने याप्रकरणी पैशे न भरलेल्या शेतकऱ्यांना एन .ओ .सी . दिली . पण ज्यांनी पैशे भरलेले आहेत त्यांना एनओसी दिलेली नाही . बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात असे प्रकार नाफाकडून घडलेले आहेत . – **संजीव उन्हाळे**

संजीव पंढरीनाथ उन्हाळे ( वय ६५, रा. बी-४, प्राइड पार्क, वेदांतनगर ) असे संशयित आरोपी संचालकाचे नाव आहे. जानेवारी २०१७ ते आजपर्यंत 'दिलासा' येथे हा प्रकार घडत होता. यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शेतीविषयक कामांसाठी कर्जपुरवठा करणाऱ्या नेटाफिम ॲग्रिकल्चर फायनान्सिंग एजन्सी प्रा.लि.( नाफा ) या कंपनीचे विधी सल्लागार सोमनाथ ढोले ( वय ४१ ) यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार २०१३ मध्ये संशयित उन्हाळे यांनी 'दिलासा'मार्फत १७२ गरजू शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासह विविध शेतीकामासाठी कर्जपुरवठा करण्याची शिफारस 'नाफा'ला केली होती. तसेच सदर कर्जवसुलीची जबाबदारीही 'दिलासा'चे व्यवस्थापकीय संचालक या नात्याने उन्हाळे यांनी घेतली होती. तसा करारही चार सप्टेंबर २०१३ मध्ये करण्यात आला होता.

# सांगोला न्यायालयात ई फायलिंग कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये ई फायलिंग प्रणालीदवारे कामकाज सुरू झाले असुन सांगोला न्यायालयात सर्व विधिज्ञांकरीता ४ मार्च रोजी ई फायलिंग कार्यशाळेचे आयोजन करणेत आले होते. सांगोला न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश श्रीमती एस. के. देशमुख,सह दिवाणी न्यायाधिश श्री. यु. एम. पाटील तिसरे सह दिवाणी न्यायाधिश श्रीमती के. बी. सोनवणे, सांगोला विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. धनंजय मेटकरी यांचे उपस्थितीत ही कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी प्रस्तावना सहायक सरकारी वकील ॲड. सारंग वांगीकर यांनी केली. मास्टर ट्रेनर ॲड. अयुब पटेल यांनी विधिज्ञांनी ई फायलिंगकरीता रजीस्ट्रेशन कसे करावे व पेपरलेस फायलिंग बाबत माहीती दिली व मास्टर ट्रेनर ॲड. नितीन बाबर यांनी केसेस ई फायलिंग प्रणालीदवारे कसे दाखल करावेत याची माहीती दिली. या कार्यशाळेस विधिज्ञांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देवुन ई फायलिंग कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

यावेळी सांगोला विधिज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ व त्यांचे लिपीक उपस्थित होते. आभार प्रदर्शन ॲड. धनंजय



मेटकरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होणेकरीता सहायकआधिक्षक आर. एम. किलजे, वरीष्ठ लिपीक डी. बी. राहीरकर, लिपीक टी. व्ही. वद्दी, लिपीक ए. एस. यादव तसेच सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी विशेष परीश्रम घेतले.

# सरपंच चषक क्रिकेट स्पर्धेत नागनाथ अर्बन संघ प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथे सरपंच चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी नागनाथ अर्बन संघाने प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामना हा नागनाथ अर्बन क्रिकेट संघ विरुद्ध पाल येथील आर्यन क्रिकेट संघ या दोन संघात झाला या सामन्यात नागनाथ अर्बन संघाने आर्यन संघाला हरवत प्रथम क्रमांक पटकावला यावेळी विजेता नागनाथ अर्बन संघ ला राजेंद्र पाथ्रीकर यांच्या हस्ते 31000 चे पारोतोशीक देऊन सत्कार करण्यात आला तसेच दुतिय क्रमांक पाल येथील आर्यन संघाने मिळवला तुतिय क्रमांक शिवशक्ती क्रिकेट संघाने मिळवला या वेळी नागनाथ अर्बन संघाचे डिजे लाऊन गावात मिरवणूक काढण्यात आली.

# जिंतूर तालुक्यात सालगडी निवडीसाठी शेतकऱ्यांची धावपळ

## यांत्रिकीकरणाच्या युगातही सालगड्याला महत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यातील शेतीची कामे करण्यासाठी सालगड्यांची महत्त्वाची भूमिका असते दरवर्षी पाडव्यांच्या मुहूर्तावर शेतकरी सालगड्याची नेमणूक करतो. पाडवा अवघ्या काही दिवसांवर असून सालगड्यांची दरही कडाडलेले दिसून येतात. त्यामुळे अनेक शेतकरी परगावाहून आलेल्या सालगड्यांसी करार करीत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहे. तालुक्यात सध्या शेती व शेतीपूरक रोजगार व्यवसाय असल्यामुळे त्यात महत्त्वाचा घटक म्हणजे शेतकरी शेतीची विविध कामे करण्यासाठी एकट्या शेतकऱ्याला शक्य नसल्याने सालगड्याची संकल्पना पुढे आली व अनेक वर्षापासून शेती कामात सालगड्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. दरवर्षी शेतकऱ्यांकडून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सलगड्याची नेमणूक केली जाते. या बदल्यात सालगड्याला शेतकरी वर्षाकाठी काही रोख रक्कम व धान्य स्वरूपात तीन ते चार क्विंटल धान्य देतात. ही पद्धत आजही कायम आहे. मात्र वाढती महागाई आणि काळानुसार सालगड्यांच्या दरात वाढ झाली आज ती एक 10,2000 हजार पर्यंत पोहोचलेली असल्याने शेतकऱ्यांना मात्र सालगडाची शोधाशोध करावी लागत असल्याचे चित्र जिंतूर तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातही दिसून येत आहे.

संकटावर मात करणारा शेतकरी कितीही संकटे आली तरी शेतकरी आपले काम चालूच ठेवतो गतवर्षीच्या नुकसानीची कात झटकून पुन्हा शेतकऱ्याला कामाला लागलेला दिसून येतो . यंदा पाडवा काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शेतकऱ्याची सालगड्यासाठी लगबग सुरू असल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागात दिसून येते .



**शेतकऱ्यांनी शेती करावी कशी** : जिंतूर तालुक्यातील बहुतांश शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असून गतवर्षी बी बियाणे, खते, औषधी, मजुरी आदी सह वाहतुकीच्या दरात वाढ झाली आहे . शिवाय मळणी, खुरपणी, कापणीचे दरही वाढले . दिवसेंदिवस वाढती महागाईचा सामान्य नागरिकांना फटका बसत असला तरी त्यात सर्वाधिक फटका हा शेतकरी वर्गाला सहन करावा लागतो . आता नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सालगड्यांचा शोधा शोध सुरू आहे . मात्र त्यांनाही कामाचे दर वाढल्याने शेती करावी तर कशी अशी भावना ही काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली .

तालुक्यातील बहुतांश शेतकरीयांत्रीकी शेतीकडे वळलेले असले तरी शेती कामासाठी सालगडी किती महत्त्वाचा आहे हे चित्र पाहावयास मिळते . बहुतांश शेतकरी एकापेक्षा अधिक सालगड्याची नेमणूक करतात यंदा सालगड्याचे दर कडाडले असून इटोली परिसरात एक लाख दहा हजार रुपये व तीन ते चार क्विंटल धान्य तर काही ठिकाणी एक लाख वीस हजारापर्यंत व तीन ते चार क्विंटल धान्य असा भाव पोहोचलेला दिसून येतो त्याशिवाय धान्यही महत्त्वाचे .

# राजन यांचा इशारा

आधुनिक केसरी

आरबीआयचे माजी गव्हर्नर आणि अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी हिंदू रेट ऑफ ग्रोथ अर्थात भारतातील हिंदू विकास दराविषयी एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. खासगी क्षेत्रातील कमकुवत गुंतवणूक, उच्च व्याजदर, मंदावलेला आर्थिक विकास दर यामुळे आपला भारत देश हा हिंदू विकास दराच्या जवळ आला आहे, असे रघुराम राजन यांनी म्हटले आहे. रघुराम राजन यांनी केलेल्या हिंदू ग्रोथ रेटच्या वक्तव्यामुळे हिंदू ग्रोथ रेट काय आहे याची चर्चा सुरू झाली आहे. हिंदू रेट ऑफ ग्रोथ अर्थशास्त्रातील एक थिअरी आहे. याचा संबंध कुठल्याही धर्माशी जोडलेला नाही. मात्र आर्थिक मंचांवर या शब्दाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. १९४७ मध्ये जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर बहुतांश नागरिक हे शेती व्यवसायावर अवबंलून होते. समाजात तेव्हा बरीच गरीबी होती. पायाभूत सुविधा म्हणजे फक्त रेल्वे होत्या. रस्त्यांचा अभाव होता. मात्र पुढे घडले असे की हळूहळू या सगळ्या गोष्टींची निर्मिती सुरू झाली. त्यानंतर स्वातंत्र्याला ३० वर्षे पूर्ण होईपर्यंत हा ग्रोथ रेट बराच कमी झाला होता. या मंद गतीने विकास करणाऱ्या विकास दराविषयी बोलताना १९७८ मध्ये हिंदू रेट ऑफ ग्रोथ हा उल्लेख झाला होता. हा उल्लेख त्यावेळी प्रसिद्ध असलेले प्राध्यापक राज कृष्ण यांनी हे नाव घेतले होते. राज कृष्ण यांनी १९७८ मध्ये हे नाव घेतल्यानंतर अर्थशास्त्रज्ञ हे नाव घेऊ लागले. १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी आपला देश आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. विकास दर हा ३० वर्षे तसाच होता. हा विकास दर ३.५ टक्के किंवा त्यापेक्षाही खाली होता. त्यामुळे हिंदू वाढीचा दर असा शब्द प्रचलित झाला. १९९१ मध्ये आर्थिक सुधारणा आणि उदारीकरणाच्या सुरुवातीनंतर 'हिंदू वाढीचा दर' मंद गती सोडून देशाचा विकास दर झपाट्याने वाढला. विशेषतः २००३ ते २००८ या काळात देशाचा विकास दर सरासरी ९ टक्के इतका होता.

# स्त्रीला जाळून आनंदोत्सव करणे संस्कृती आहे का ?

आधुनिक केसरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

**भारतात अनेक रुढी परंपरा वर्षानुवर्षे चालत आलेल्या आहेत. अनेक अनिष्ट रुढी सामाजिक क्रांती च्या माध्यमातून अनेक सामाजिक क्रांतिकारक यांनी हानुन पाडले आहेत. परंतु आजही अनेक रुढी परंपरा कायम आहेत. हजारो वर्षापासून शिक्षणापासून दुर ठेवून अज्ञान आणि अंधश्रद्धा पेरून तर्क व विज्ञानवादाची हत्या केली गेली. परंतु अलिकडे शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रकाश समाजात पडला परंतु हजारो वर्षे माणसिक गुलामगिरी मध्ये असलेला समाज शिक्षीत होऊन ही मानसिक गुलामगिरी व रुढी परंपरा मधून दिल्या गेलेल्या अज्ञान व अंधश्रद्धा आजही पाळताना दिसत आहे.**

आजही शिकलेल्या लोकांच्या मनात भिती आहे जुन्या रुढी परंपरा आपण झुगारून दिल्या तर आपले वाईट होईल. अनेक लोक अंधश्रद्धा यासाठी पाळत आहेत कारण त्यांना वाईट होईल याची माणसिक भिती आहे. थोडक्यात काय तर शिक्षणाचा वापर फक्त नोकरी करण्यासाठी आज होताना दिसतोय. जेव्हा महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण सुरू केले तेव्हा त्यांना वाटले होते शिक्षणामुळे समाज जागृत होईल व मेंदूचा वापर करून सत्य असत्या मधला फरक समजून सत्याचा स्विकार ते तर्क, पुरावे, विज्ञान व कसोटीवर तपासून करतील आणि शैक्षणिक क्रांतीमुळे समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धा कायमच्या जाऊन समाजात विज्ञान व तर्कशुद्ध आचार विचार तयार होतील. परंतु सध्य परिस्थिती आहे कि लिहता वाचता येणाऱ्या लोकांना काय वाचाव हे कळत आणि काही लोकांनी वाचले तर अर्थ कळत नाही. तर्क आणि विज्ञान तर दुरच. सावित्रीमाई फुले मुळे शिकलेल्या महिलांनी सावित्रीमाईलाच वाचले नाही ही लाजिरवाणी आणि कृतघ्न पणाची गोष्ट आहे. असो तरही महत्वाचा प्रश्न हा आहे प्रत्येकाने तर्क व विज्ञानावर आधारित वर्तन ठेवले पाहिजे काळ वेळेनुसार बदलले आवश्यक आहे. सर्व च रुढी परंपरा झुगारून द्यायच्या तर मुळीच नाही ज्या परंपरा मानसाचा मेंदु उघडून माणसाला जागृत करतो, माणसाला माणसाशी मानुसकीने वागायला शिकवते, ज्या माणसाला समान समजून मानसाचे कर्म बघुन श्रेष्ठत्व ठरवतात त्या नक्कीच चांगल्या रुढी परंपरा आहेत. परंतु रुढी परंपरा मधून अज्ञान, अंधश्रद्धा आणि द्वेष पसरत असेल तर त्या रुढी परंपरा सोडून देणेच फायद्याचे ठरते.

भारतात विषेशतः महाराष्ट्रात अनेक महापुरुष व संत होऊन गेले. अनेकांनी रुढी परंपरा ह्या चुकीच्या व कुचकामी कशा आहेत यावर प्रबोधन केले. ज्या संतानी आपल्या तर्काच्या व पुराव्यांच्या आधारावर अनिष्ट रुढी परंपरा हानुन पाडल्या त्याच संताच्या भुमित आपण संताचे विचार बाजूला ठेवून तर्क व विज्ञानाचा आधार न घेता संताच्या विचाराच्या विरोधात काम करत आहोत. बर जे करतो त्याला ना तर्क असतो ना पुरावा असतो तरीही आपण ते करतो याचाच अर्थ आपला मेंदु आपल्या डोक्यात असला तर त्यावर ताबा आपला नाही म्हणजेच आपण गुलाम आहोत आणि हिच बाब स्वतः च्या कुटुंबांचे आणि देशाचे वाटोळे करण्यासाठी पुरेशी असती. आमच्या देशात अनेक महापुरुष व संत होऊन गेले ज्यांनी पर स्त्रिला महिलेला आईचा दर्जा दिला. पर स्त्रिला आई मानण्याची शिकवण संतानी दिली. परस्त्रिचा आदर करणे हे आपली नितीमत्ता, वैचारिकता व संस्कार दाखवत असते. आपण एकीकडे स्त्रियांची देवी म्हणून पुजा करतो आणि दुसरी कडे एका स्त्रिला जाळून आनंदोत्सव साजरा करतो. एकिकडे महिलेंची पुजा करायची आणि दुसरीकडे स्त्रीलाच जाळून आनंदोत्सव साजरा करायचा हे मनाला पटणारे, तर्काला न पटणारे आहे. एखाद्या चा मृत्यू झाला तर सर्व गाव सुतक पाळून दुःख व्यक्त करण्याची आमचु संस्कृती. एखादी स्त्री घरी आली तर तीला साडी, चोळी, पक्वान्न करून सन्मान करण्याची आमची संस्कृती असेल तर होळीका स्त्रिला जाळून आनंदोत्सव साजरा करणे ही विकृती नाही का ? मुळात चुकिच्या, विकृत, अज्ञान व अंधश्रद्धा यांचा संबंध एखाद्या धर्माशी जोडणे हेच सर्वात मोठे अज्ञान आहे. मग होळीकाला का जाळते जाते याबद्दल दोन गोष्टी आहेत. एक गोष्ट तर बहुतांश लोकांच्या मनाला पटतच नाही. परंतु आपण दुसरी



गोष्ट जी जास्त लोकांना पटते ती आपण तर्काच्या आधारावर तपासून बघू. तर्क करताना डोक्यात पूर्वग्रह न ठेवता निष्पक्ष करणे आवश्यक आहे. सर्वांना माहिती असलेली गोष्ट म्हणजे हिरण्यकश्यप हा स्वतः ला देव समजत होता विष्णु प्रमाणे सर्वांनी त्याची पुजा करावी अशी त्याची इच्छा होती अनेक लोक त्याची पूजा करत होते परंतु त्याचा मुलगा प्रल्हाद त्याची पुजा न करता विष्णुची पुजा करत होता. आणि प्रल्हाद ला धडा शिकवण्यासाठी होळीका व हिरण्यकश्यप कट करतात होळीका कडे शिव अर्थात शंकराने दिलेले एक वस्त्र दिले होते त्यामुळे होळीकाचे अग्नीपासून संरक्षण होत होते. परंतु प्रल्हाद आणि होळीका जेव्हा सरणावर बसतात तेव्हा प्रल्हाद देखील विष्णुची भक्ती करतो त्यामुळे विष्णु जोराची हवा निर्माण करतात त्यामुळे होळीकाच्या अंगावरील कापड उडून प्रल्हाद यांच्या अंगावर जाते. आणि होळीका जळते आणि प्रल्हाद वाचतो अशी ही कहाणी आहे. म्हणून आपण दरवर्षी होळीका दहण करतो. या गोष्टीवर अनेक तर्क निर्माण होतात. परंतु अजूनही ह्या तर्कावर कोणीच चर्चा का करत नाही आपण जास्त खोलवर चर्चा न करता ढोबळमानाने चर्चा करू जर होळीकाला शिव अर्थात शंकर हे स्वतः अग्नीपासून संरक्षण होण्याचे वस्त्र देतात याचाच अर्थ होळीका चांगली होती म्हणून तर शिव अर्थात शंकराने तिला संरक्षणासाठी कापड दिले. दुसरा तर्क शिव शंकरापेक्षा विष्णू जास्त ताकतवान होते हे तर या कथेमधुन दाखवायचे नाही ना ? कारण विष्णुच्या भक्तीमुळे जोराची हवा येते अग्नीपासून संरक्षण करणारे वस्त्र हे प्रल्हाद च्या अंगावर जाते. तिसरा तर्क वस्त्र अनेक असतील पण एकच वस्त्र जे होळीकाला दिले तेच तिचे संरक्षण करणार होते म्हणजे काही खास मंत्र वा आजच्या भाषेत आपण पासवर्ड म्हणू ज्यामुळे होळीकाचे संरक्षण होईल अशी व्यवस्था करून दिली असेल. पासवर्ड फक्त समजण्यासाठी घेऊ या कारण आज पासवर्ड मुळे संरक्षण होते हे जाणीव सर्वांना आहे. मग होळीकाचा पासवर्ड प्रल्हादसाठी कस काय कामी आला ? आज डॉक्टर आजर एक असला तरी व्यक्ती बघुन औषधी सुद्धा वेगवेगळ्या देतो मग होळाकासाठी असलेले वस्त्र प्रल्हाद साठी कस काय कामी आले. एक गोष्ट मनाला टोचणारी आहे ती म्हणजे शिव अर्थात शंकर हे कधीच कोणाला प्रसन्न होत नव्हते परंतू रावणाला प्रसन्न होत होते. रावण हा शंकराचा सर्वोत्तम भक्त होता. रावणाकडे सुख संपती आणि ताकद खुप होती त्याचे मरण कशात आहे हे शत्रुलाही माहिती नव्हते तरीही रावणाची हत्या केली जाते.

होळीकाला शिव शंभर स्वतः अग्नीपासून संरक्षण व्हावे म्हणून वस्त्र दिले जाते तरीही ती जळते. यादोन्ही मध्ये साम्य आहे ते म्हणजे शंकराचा आशिर्वाद दोघांवरही होता. आणि याच दोघांना दहण करून आनंदोत्सव साजरा केला जातो. यावर चर्चा, तर्क होऊन मुळ मुद्दा शोधुन काढायला पाहिजे. कारण दोन्ही बाबी खुपच गंभीर आहेत. अजून एक तर्क संबंध गोष्टीवरून असे लक्षात येते हा वाद घरगुती होता मग याचा आनंदोत्सव सामाजिक का ? आणि तोही स्त्रिला जाळून ? बर होळीमध्ये वाईट गोष्टी चे दहण करतो म्हणतात मग देशात बॉम्ब स्फोट करणारे वाईट नाही का ? देशातील महिलांवर बलात्कार करणारे वाईट नाहीत का ? देवा धर्माच्या नावाखाली लोकांची लुट करून मानसिक भीती निर्माण करणारे वाईट नाहीत का ? मग आज अशा लोकांना पाठीशी घातले जाते त्यांच्या साठी रस्त्यावर उतरले जाते. आणि दुसरीकडे एका स्त्रिला जाळून आनंदोत्सव साजरा करून वाईटाचा जाळले असे दाखवले जाते. खरचं वाईट सर्व जळाले का ? जर सत्याची बाजू घेणे, महिलांचा सन्मान करणे आमची संस्कृती असेल तर भ्रष्ट लोकांना पाठीशी घालणे महिलांचा मान सन्मान न करणे ही संस्कृती कोणाची आहे हे ओळखून आपण आपले आचार व विचार वेळेनुसार काळानुसार बदलणे आवश्यक आहे तरच आपण सुशिक्षित, सज्ञान आणि विज्ञानवाद समाजाची जडण घडण करू शकू.

# डिजिटल माध्यमातील पत्रकारांसाठी धोक्याची घंटा

आधुनिक केसरी

**फेसबुक इन्स्टंट आर्टिकल पुढील महिन्यापासून बंद होणार आहे. फेसबुकवर येऊन युजर वाचत नाही. त्याचा कल पाहण्याकडे आहे आणि तो वाढत वाढत आता जवळपास ९७ टक्क्यांच्या जवळ गेला आहे. त्यामुळे उरलेल्या ३ टक्के युजर्ससाठी इन्स्टंट आर्टिकलचे फिचर देण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे एप्रिल २०२३ पासून फेसबुककडून इन्स्टंट आर्टिकल बंद करण्यात येणार आहे. खुद्द मेटाने या संदर्भातील माहिती दिली आहे. इन्स्टंट आर्टिकल बंद होणार याचा अर्थ त्यामाध्यमातून येणारे युजर्स किंवा ट्रॅफिक कमी व्हायला लागणार आणि परत ते पूर्ववत करणे जवळपास अशक्य असणार. सध्या फेसबुकवर जवळपास ३७ हजार पब्लिशर्स इन्स्टंट आर्टिकल सुविधेचा वापर करतात.**

त्यातही मध्यम आणि लहान स्वरुपाच्या पब्लिशर्ससाठी इन्स्टंट आर्टिकल पैसे कमाविण्याचे आणि ट्रॅफिक आणण्याचे चांगले साधन होते. पण ते बंद होणार असल्याने त्याचा फटका निश्चितपणे डिजिटल माध्यमातील सर्व पब्लिशर्सना भोगावा लागणार आहे. एकीकडे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स बॉट्स अर्थात चॅट जीपीटी, बार्ड एआय यांच्यामुळे न्यूज वेबसाईट्सपुढे आव्हान उभे राहिलेच आहे. त्यातही यामध्ये होत असलेल्या सुधारणा आणि ग्राहकांमध्ये हे बॉट्स कसे वापरायचे याची वाढत असलेली जागरुकता यामुळे पुढील काळात माहिती घेण्यासाठी किंवा रेफरन्ससाठी न्यूज वेबसाईटवर येण्याची शक्यता कमी कमी होत जाणार. ब्रेकिंग न्यूज न मागताच देणारी हजारो प्लॅटफॉर्म्स किंवा हँडल्स तयार झाली आहेत. त्यामुळे त्यासाठीही न्यूज वेबसाईटवर जाण्याची गरज नाही. गेल्या काही वर्षांपासून टेक्नॉलॉजीत होत असलेल्या बदलांमुळे आणि सुधारणांमुळे न्यूज पब्लिशर्स सतत वेगवेगळ्या आव्हांनांना सामोरे जात आहेत. या बदलांची गती खूप वेगवान आहे. एखादा बदल आत्मसात करून त्या प्रमाणे बिझनेस आणि इतर रचना करेपर्यंत तो बदल मागे पडलेला असतो आणि नवे काहीतरी आलेले असते. सोशल मीडियातून येणारे ट्रॅफिक येत्या काळात कमी कमी होत जाणार ही सगळ्याच डिजिटल माध्यमविश्वासाठी धोक्याची घंटा आहे. कारण सोशल मीडियातून येणाऱ्या ट्रॅफिकवर अवलंबून असलेल्या हजारो साईट्स सध्या भारतात आहेत. त्या सर्वच या बदलांमुळे बंद पडण्याच्या मार्गावर जाणार आहेत. पत्रकार म्हणून आपण यातून काय समजून घेतले पाहिजे. १. महत्त्वाचे म्हणजे जे पत्रकार डिजिटल माध्यमात सध्या संपादकीय विभागात काम करता आहेत. त्यांनी तातडीने पर्यायी व्यवस्था किंवा व्यवसाय शोधला पाहिजे. येत्या वर्षभरात या सगळ्या बदलांचे साईड इफेक्टस दिसायला लागतील. त्यातून पहिला घाव हा संपादकीय विभागावरच पडणार हे निश्चित. संपादकीय विभागातील मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात कमी केले जाईल. कारण ट्रॅफिक नाही म्हणजे बिझनेस नाही आणि बिझनेस नाही म्हणजे कॉस्ट कटिंग हे ठरलेले दुष्टचक्र आहे. दुसरे म्हणजे इन्स्टंट आर्टिकल बंद होणार याचा अर्थ लिंकचे डिस्ट्रिब्युशनही फेसबुक कमी करणार. त्यामुळे फेसबुकवर लिंक्स शेअर करून त्यातून खूप काही हातात येईल, असे मुळीच नाही. केवळ क्लीकबेट हेडिंग करण्यात माहीर असलेल्यांसाठी आता बुरे दिन येणार हे तर निश्चित. २. सोशल मीडियातून येणारे ट्रॅफिक कमी होत गेल्यावर अर्थातच गुगल किंवा सर्च इंजिनकडून मिळणारे ट्रॅफिक यावर लक्ष केंद्रित होणार आहे. पण चॅट जीपीटीसारख्या नव्या प्रॉडक्टमुळे सर्च इंजिनपुढेच आव्हान उभे राहिले आहे. माहिती मिळवण्यासाठी युजर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स बॉट्सचा वापर हळूहळू करू लागणार. एकाच ठिकाणी आवश्यक माहिती मिळू लागल्यावर ही साईट बघ, ती साईट बघ हे प्रकार आपोआप कमी होणार. महत्त्वाचे म्हणजे रेफरन्ससाठी आतापर्यंत न्यूज वेबसाईट प्रामुख्याने बघितल्या जायच्या. पण आता चॅट जीपीटीमुळे हे कमी होत जाणार. याचा फटका ऑरगॅनिक ट्रॅफिक किंवा गुगलकडून मिळणाऱ्या ट्रॅफिकवरही होणारच. ३. सब्सक्रिप्शन मॉडेल भारतात यशस्वी झालेले नाही. मुळात फुकटच इतका कंटेट मिळतो आहे. मग तो वाचण्यासाठी पैसे कशाला द्या, अशी भारतीय लोकांची मानसिकता झाली आहे. सध्या ट्रेंड असा आहे की लोकांनी जरी महिन्याचे किंवा दोन महिन्यांचे सब्सक्रिप्शन घेतले तरी ते कंटिन्यू करत नाहीत. त्यामुळे सब्सक्रिप्शन मॉडेलमध्ये सब्सक्रायबर ड्रॉप होण्याचे प्रमाण खूप आहे. त्यामुळे तो पर्याय नाही हे माध्यम कंपन्यांना कळले आहे. ४ .भाषांतर करणारे अनेक टूल्स मोफत उपलब्ध आहेत. ते वापरायलाही सुरुवात झाली आहे. या टूल्समध्ये सातत्याने सुधारणाही होत आहेत. विशेषतः भारतीय भाषांमधील भाषांतर बऱ्यापैकी नेमके आहे. त्यामुळे हिंदीतून इतर प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करण्यासाठी या टूल्सचा वापर मोठ्या प्रमाणात होतो आहे. येत्या काळात केवळ भाषांतरासाठी कुशल मनुष्यबळ लागणार नाही. त्यामुळे संपादकीय विभागातील अशा मनुष्यबळाला घरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो. ५. ॲग्रिगेटर्सच्या माध्यमातून ट्रॅफिक येत असले तरी त्यातून पदरात काहीच पडत नाही. नुसतेच आकडे मोठे दिसतात पण जाहिरातदाराकडे गेले की तो उभंही करत नाही. त्यामुळे त्याचाही काहीच उपयोग नाही. अशी सगळी परिस्थिती असताना येत्या वर्ष ते दोन वर्षात डिजिटल माध्यमांमध्ये खूप बदल झालेले दिसतील. हे बदल निश्चितच पत्रकारांसाठी फारसे आशादायक नक्कीच नाही. त्यातही वर्षांनुवर्षे एकाच पद्धतीचे काम करत असलेल्या पत्रकारांसाठी हा फटका जास्त तीव्र असणार, हे नक्की.

**विश्वनाथ गरुड, पुणे**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोटारसायकल-मोबाईल चोरी करणाऱ्यांस बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

रवींद्र कांबळे

**सांगोला :** पोलीसांनी मोटार सायकल चोरी करणारे व मोबाईल चोरी करणारे गुन्हेगारास जेरबंद करुन गुन्हे उघडकीस आणून त्यांच्याकडून एकूण ०४ मोटारसायकल व २१ मोबाईल हँडसेट हस्तगत करुन एकुण ५,१२,५००/-( पाच लाख बारा हजार पाचशे रुपये ) रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात यश आहे दिनांक २६/१/२०२३ रोजी सकाळी ११/२१ वा. सुमारास फिर्यादी यश हणुमंत कारंडे रा. महुद् ता.सांगोला जि. सोलापूर यांची एक काळया रंगाची होन्डा कंपनीची शाईन मोटारसायकल ही अज्ञात चोरटयांनी चोरले बाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्याचा तपास चालू असताना मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा विभाग मंगळवेढा यांनी व मा. पोलीस निरीक्षक यांनी सांगोला पोलीस ठाणे हददीत मोटार सायकल चोऱ्या व मोबाईल चोऱ्या वाढत असल्याने एक तपास पथक तयार करण्यात आले होते. तरी दि. २२/०२/२०२३ रोजी बागलवाडी व अचकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील दोन इसम त्याचे ताब्यातील मोटार सायकल कमी किंमतीत व कागदपत्रे नसलेली वाहने विक्री करीत आहे, अशी बातमी गोपनीय खबऱ्या मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर इसमाचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेवून त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांचे ताब्यातुन मिळुन आलेली बिना नंबरची मोटारसायकल ही महुद, ता. सांगोला येथून चोरी केल्याची कबुल दिल्याने त्याच्याकडे अधिक तपास केला असता सदर दोन आरोपीनी त्यांचे इतर आणखीन एक साथीदारांचे मदतीने जत, कोल्हापूर, कर्नाटक येथून मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने व सदरच्या मोटार सायकल हया त्याचे इतर साक्षीदार यांचे ताब्यातुन मिळुन आल्याने सदर गुन्हयात एकुण ०३ आरोपी व ०१ विधी संघर्षीत बालक ताब्यात घेवून त्यास सदर गुन्हयात ०३ आरोपीना अटक करण्यात आली असुन सदर आरोपीनी सांगोला व जत, कोल्हापुर, कर्नाटक याठिकाणाहुन ०४ मोटार सायकल हस्तगत करण्यात आलेल्या आहे. तरी सदर जप्त करण्यात आलेल्या मुददेमाल हा अंदाजे १,१५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तरी सांगोला पोलीस



ठाणेकडील व इतर राज्यातील व जिल्हयातील पोलीस ठाणेकडील गुन्हे उघडकीस आणण्यास सांगोला पोलीसांना यश आलेले आहे. तसेच सांगोला पोलीस ठाणे गु.र.नं.१००/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयामध्ये फिर्यादी तानाजी हरीबा घाडगे रा. शिवणे ता. सांगोला जि. सोलापुर यांचा दिनांक ३०/०१/२०२२ रोजी सांगोला आठवडा बाजार येथुन एक काळ्या रंगाचा सॅमसंग कंपनीचा A205 हा अज्ञात चोरटयांनी चोरले बाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्याअनुशंगाने सदरचा तपास पोना/१४२५ पाटील,नेमणुक सांगोला पोलीस ठाणे हे करीत असताना त्यांना सदर गुन्हयात पाहिजे असलेली एक महिला आरोपी ही पानवन ता. माण जि. सातारा येथे असल्याची गोपनीय बातमीदा-या मार्फत बातमी मिळाल्याने सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी सांगोला पोलीस ठाणे कडील एक तपास पथक तयार करुन बातमीचे ठिकाणी जावुन पाहिजे असलेल्या महिला आरोपीचा शोध घेतला असता ती पानवन ता. माण जि. सातारा येथे मिळुन आल्याने ती ताब्यात घेवुन तिचे कडे तपास केला असता तिचे कडुन सांगोला तालुक्यातील व सांगोला आठवडा बाजार व इतर ठिकाणाहुन चोरलेले व्हीओ, ओपो, रेडमी,एमआय, रिअल मी, अशा वेगवेगळ्या कंपनीचे २१ मोबाईल एकुण किंमत रुपये ३,९७,५००/-रुपयांचा मुद्देमाल तिचे कडुन् हस्तगत करण्यात आलेला आहे. तरी सांगोला पोलीस ठाणेकडील गुन्हे उघडकीस आणण्यास सांगोला पोलीसांना यश आलेले आहे. मोटार सायकली चोरी करणारे आरोपी 1 ) प्रवीण भाऊसाहेब चळेकर 2 )समाधान दत्तात्रय माने राह. दोघे. बागलवाडी ता सांगोला 3 ) नैशाद पैगंबर मुलाणी रा अचकदाणी ता सांगोला. 4 ) अल्पवयीन मुलगा मोबाईल चोरी करणारी महिला आरोपी नामे. 1 शाहिदा महादेव तुपे रा पाणवन ता. माण जि सातारा.

शिरीष सरदेशपांडे सो, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रागिण, हिम्मत जाधव, अप्पर पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण, राजश्री पाटील मॅडग, उपविभागीय पोलीस अधिकारी गंगळवेढा विभाग मंगळवेढा, पोनि श्री अनंत कुलकर्णीसो, यांच्या मार्गदर्शनाखाली, रापोनि/रविंद्र राजुलवार, पोहेकॉ/१५४७ दत्ता वजाळे, पोहेकॉ/२६४ विकास क्षिरसागर, पोना/ १६८२ अभिजीत गोहोळकर, पोना/१४२५ बाबासाहेब पाटील, पोकॉ / ३३५ लक्ष्मण वाघमोडे, गपोकॉ/४०६ प्रियंका बनसोडे, गपोकॉ/४८२ अर्चना चव्हाण व सायबर पोलीस स्टेशन कडील ठोकल्या बेड्या पोना/५ युसुफ पठाण यांनी गदत करून गुन्हा उघडकीस आणला.





# पानोली येथे वृद्ध शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला!

आधुनिक केसरी न्यूज

**पानोली :** येथील पवळदरा परिसरात मोहन पवार वय ६५ हे वृद्ध शेतकरी आज ९ वाजता जनावरे चारावयास गेले असता बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. त्याचा प्रतिकार करण्यासाठी मोहन पवार व त्यांचे चिरंजीव सचिन पवार यांनी बिबट्याला काठीने मारण्याचा प्रयत्न केला. परंतु या हल्ल्यात मोहन पवार हे गंभीर जखमी झाले असून प्राथमिक उपचारासाठी त्यांना पारनेर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वीही पवळदरा , सिद्धेश्वरवाडी, गाडेकर मळा, माळवाडी वडुले रस्ता येथे अनेक वेळेस बिबट्याचे दर्शन झालेले आहे. वन खात्यालाही या पूर्वी अनेक वेळा रहिवाशांनी वन खात्याकडे या सबंधी पत्र व्यवहार केला. अनेक ठिकाणी पिंजरेही लावण्यात आले होते. परंतु बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्यांना यश आले नाही . परंतु मोहन पवार यांच्यावर झालेल्या आजच्या हल्ल्यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे व बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी परिसरातून मागणी करण्यात येत आहे.

# विद्यार्थी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा.बोराडे, डॉ. मैराळ, डॉ. पुरी यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील क्रांतीचौक मधील नव्याने निर्माण केलेल्या शिवसृष्टीमध्ये प्रा. बाळासाहेब बोराडे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तसेच डॉ. प्रमोद मैराळ यांना पीएचडी पदवी प्राप्त केल्या बद्दल आणि डॉ. विष्णु पुरी यांनी निसर्ग उपचार पद्धतीमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वरील तीनही मान्यवरांचा विद्यार्थी प्रतिष्ठानच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरमधील क्रांतीचौक येथील शिवसृष्टी मध्ये विद्यार्थी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा. सुरेश राठी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रम प्रास्ताविकामधून सिद्धार्थ गायकवाड यांनी सत्कारमूर्तींच्या उल्लेखनीय कार्याचा परिचय करून दिला. यानंतर साईनाथ औंढेकर,सचिन गोसावी, भरत खिल्लारे यांनी आपल्या मनोगतामधून सत्कारमूर्तींच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राध्यापक सुरेश राठी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना म्हणाले की प्रा.बाळासाहेब बोराडे यांनी सरकारी नोकरीला प्राधान्य न देता शेतकरी, भटक्या,वंचित घटकाला न्याय मिळावा यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून लेखणीला धार दिली. त्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला ही अभिमानाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे डॉ. प्रमोद मैराळ यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही गरिबीचे भांडवल न करता अंधत्वावर मात करून शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च अशी पीएच. डी पदवी मिळवली ही आपणा सर्वांसाठी गौरवाची बाब आहे.

डॉ. विष्णू पुरी यांनी कोरोना काळामध्ये निसर्गोपचार पद्धतीच्या माध्यमातून शारीरिक व्याधीने हताश झालेल्या त्रस्त लोकांना रुग्णसेवा देऊन त्यांच्या जीवनात जगण्याची उर्मी निर्माण केली. ही अभिमानस्पद गोष्ट आहे.म्हणून त्यांचा गौरव होत आहे असेही प्रा.राठी म्हणाले. विद्यार्थी प्रतिष्ठानच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.प्रा. बाळासाहेब बोराडे यांचा सत्कार प्रा.सुरेश राठी,डॉ. विष्णू पुरी यांचा सत्कार भरत खिल्लारे,डॉ.प्रमोद मैराळ यांचा सत्कार सिद्धार्थ गायकवाड यांनी केला. या कार्यक्रमास साईनाथ औंढेकर,सचिन गोसावी,सिद्धार्थ गायकवाड ,भरत खिल्लारे,सौ. आशा खिलारे,डॉ.विष्णु पुरी, डीगांबर भोजने,आर्यन खिल्लारे,समर्थ औंढेकर,आबा, यासह विद्यार्थी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साईनाथ औंढेकर यांनी तर आभार भरत खिल्लारे यांनी मानले.



# पंढरपूरातील 'या' भागात रस्ता रुंदीकरण होणार काय?

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :**श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये पूर्वी अरुंद रस्ते होते या अरुंद रस्त्याची रुंदीकरण १९८४ च्या जवळपास झाले होते. तदनंतर या मंदिर परिसरातील रस्त्यालगतचे दुकाने पुन्हा नव्याने सुरू झाली. चार यात्रेच्या दरम्यान या परिसरामध्ये भाविक भक्तांची गर्दी असते. आता याच परिसरामध्ये कॅरीडोर च्या निमित्ताने आता पुन्हा एकदा या भागातील घरे व दुकाने हटवली जाणार आहेत. या परिसरातील दुकानदारांनी आपापल्या दुकानाच्या जागेसमोरील भागामध्ये काही प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे हा रस्ता अरुंद झाला. याचा असा परिणाम झाला की गर्दी होते म्हणून या परिसरामध्ये अत्यावश्यक सुविधा या आपत्कालीन वेळेमध्ये आज त्या आवश्यक सुविधा, वैद्यकीय सुविधा उपलब्ध होऊ शकणार नाहीत. असे असंख्य कारणे सांगून आज कॅरीडोर हा या परिसरात होऊ पाहत आहे. अशी परिस्थिती येथील स्थानिक दुकानदाराने तसेच हात गाडीवाले फेरीवाले या व्यापारी वर्गाने आणलेली आहे. असेच म्हणावे लागेल. आता सध्या पंढरपूर शहरातील शिवाजी चौक ते स्टेशन रोड ला जाणारा हा रस्ता हा शहरातील मोठा रस्ता म्हणून ओळखला जातो. या रस्त्यावरच्या दोन्ही बाजूने आज आपणाला चार यात्रा असो किंवा अन्य दिवस असो या रस्त्यावर दोन्ही बाजूने आपणाला अतिक्रमण झालेले दिसून येते. फुटपाथ हा पादचाऱ्यांना चालण्यासाठी असते. परंतु या परिसरातील फूटपाथ आज आपणाला अतिक्रमण केलेले हात गाडी विक्रेते, फळ विक्रेते, नाश्ता सेंटर वाले, कॅन्टीन, छोटे-मोठे दुकान किंवा मागील दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर केलेले अतिक्रमण तसेच असंख्य मोटारसायकली या रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या दिसून येतात. असा हा स्टेशन रोडचा मोठा म्हणवला जाणारा रस्ता अतिशय अरुंद झालेला आहे. या अतिक्रमणाकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष असते तसेच वाहतूक पोलिसांचे देखील दुर्लक्ष असते असेच सध्या तरी दिसून येत आहे अशीच परिस्थिती जर अजून काही वर्ष राहिली तर या भागामध्ये देखील रस्ता रुंदीकरण हे होऊ शकते.

महाराष्ट्र Business Katta












# ज्यांना शेत आहे त्यांनी बघितलाच पाहिजे असा सिनेमा 'रौंदळ' !

## संयमाचा परीघ





चित्र : बाबूराव पाटील, भोकर

प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १८

आधुनिक केसरी

देशसेवेचं स्वप्न उराशी बाळगुन मिलिट्रीत नौकरी मिळावी म्हणून ग्राऊंड आणि तोंडी परीक्षेची तयारी व्हावी म्हणून जिवतोड मेहनत करणारा तरुण अखेर एजबार झालं म्हणून दारात हताश-निराश बसलेला...

त्याची सामान्य आई तुमच्या माझ्या मायीसारखी माय...त्याची समजूत काढते आणि आजोबा त्याला 'देशसेवा म्हणजे सिमेवर कायम बंदुक घेऊन लढणंच नसतं केवळ...शेतीत मेहनत करुन धान्य पिकवून देशाला धान्यपुरवठा करणंही देशसेवाच' असल्याचं सांगून, घरची सात-आठ एकर जमीन, बैलजोडी आणि ट्र्याक्टर असताना असं हताश निराश होवून बसणं कांही खरं नसल्याचं सांगून त्याचं बळ बांधतो. 'हीच खरी आपली आहे त्या आवस्थेतली बलस्थानं' समजावून सांगणारा सर्वार्थानं व्यवहार ज्ञानात निपून आजोबा. माय-बाप आणि आजोबाचं हे असं काळजीमिश्रीत आपुलकी पारांगत तत्वज्ञान शिकून सवरुनही नौकरी मिळात नाही याचं दुःख कवटाळंत बसणं शहानपणाचं लक्षण नसल्याचं सांगणं नायकाच्या ध्यानात येतं आणि तो बापाची हातसोडवन करु लागतो शेतीत. आपल्या दोन चाकी गाडीवर रानात कांही बिया-भरणाचं, खातामुतांचं सामान घेऊन जाणं असो नाही तर घरी वैरणकाडी, पेंड आणनं, बाजारात मिरच्या विकायला नेनं असो,आडप-झडप पडंल ती कामं करतो. एकुन काय तर रानच्या कामात आंग म्हेनत सुरु करतो, माय-बाप-आजोबासह शेताला पंढरी समजून वाहून घेतो.

रानाच्या रस्त्यावर नाकी-डोळी निटास असलेल्या गाभुळ्या बोरागत रामकाटीवानी वाढलेल्या झडप नायिकेचं घर आहे जिथं तिनं कडबा कातरायची कैची वाटंत आडवी टाकून नायकाचा रस्ता आडवलेला असतो.हे असलं गाव पातळीवर हमखास नजरेत पडणारं खरंखुरं चित्रण नायक नायिकेची देहबोली आणि नायिकेच्या नजरेतली नायकासाठीची निरागस प्रेमभावना म्हणजे गाव मनात हिरवंगार होत रहानं आहे.अशी निरागस प्रेम कथा फुलो-यात येते ती एक दोन गीतांनी ज्याचा ताल आपलं मन धरल्या शिवाय रहात नाही.हुरड्यातुन पुढं सरकायच्या वयातली कांही फारंच भावुक अल्लड जग मनात घर करुन रहातं. तशी ही पोर या पोरावर जीव ओवाळून टाकणारी. आपल्या जोडीला हाळंद लागावी आणि कारला या पोरासाठीच आपुन भरावा वाटणं यात कांहीही वावगं नाही. त्यानं आपल्याला मुंडावळ्या बांधाव्या म्हणून वारंवार मनाचा हिय्या करुन कातर रस्त्यावर टाकणारं हे गोड प्रपोजल केवळ आपलं कशातच कांही नाही म्हणून मनात असूनही तिला बगल देणारं हे पोरगं आपल्याला कधी जिंकुन घेतं कळंतही नाही. अरेख हिय्या करुन अखेरचं विचारावंच म्हणून त्याला मंदीराच्या परीसरातच ती विचारते, "कचं का पक्कं' तेंव्हा गोरामोरा झालेला गावाकडला आपला पोरगा सुसंस्कृत पोरगा कसा दिसतो ते सिनेमात बघणं कधीबी चांगलं.घरच्यांच्या, थोरामोठ्यांच्या ऐकन्यातलं, परीस्थितीचं भान असलेलं, फार संयमानं सगळ्या यातना अवहेलनांना सामोरं जाणारं, प्रेम ही आपली या घडीची निकड नाही याची सुंदर समज असलेलं पोरगं परिस्थितीच्या जुवाला मान देवून चलंत असतं. या सिनेमातुन समोर आलेलं साखर सम्राटांकडून होणारं सामान्य ऊस उत्पादक शेतक-यांचं आतोनात नुसकान शेतक-यांचं शोषण शेतीशी संबंध नसलेल्या माणसांच्या आकलनाच्या बाहेरची गोष्ट होती. या सिनेमामुळं शेतकरी आणि त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी 'रौंदळ' किमान एकदा तरी नजरे खावून घालनं शेतक-यांच्या संबंधानं सगळ्या समाजाची गरज आहे.भवतालातल्या गावपातळीवरील राजकारणानं गाठलेलं किळसवानं टोक आपले ब-यापैकी डोळे उघडण्याचं काम करतं. 'बिट्टूशेट' ही व्यक्तीरेखा आपल्या टकु-यात भिनते ती त्या व्यक्तीच्या राजकीय जीवनशैलीमुळं आणि तीचा पटकथेनं केलेला अंतही आपल्याला समर्थनीय वाटंत जातो.शब्दांची कमालीची मर्यादा संपली की हाती शस्त्र येतं हे इतकं साधं सोपं वर्तनविषयक निसर्गनियमन आहे. किमान बिट्टू शेटचा धोरणी राजकारणी बाप शेतक-यांचे नेते आणि गावपातळीवरील सरपंच हाताशी धरुन गावं अक्षरशः पिळून टाकतो हे नागडं वास्तवही लपून रहात नाही.आपल्या क्रुर मग्रुर मुलाच्या असमर्थनीय कुटान्यांवर जबाबदारीने कान पिळायचे सोडून मिडीया, पोलीस प्रशासनाला हाताशी धरुन परीस्थिती दडपून टाकण्याचा प्रयत्न करतो,हे सर्वार्थानं अशोभनीय आणि असमर्थनीय आहे.अशा व्यवस्थांचा अखेर असाच व्हावा का हा प्रश्नही अस्वस्थ करुन जातो.हातात तांबी किंवा फावडं घेऊनच अशा शोषणाचा समाचार घेणारी हा जबरदस्त शेतीचा गुदमरलेला श्वास मोकळा करणारा वाटतो. आपला दुष्मन खरंच चीन, पाकिस्तान आहेत का ? नाहीच हो ! या सिनेमात दाखवलेला तीन पिढ्यांचा संघर्ष जीव होरपळून टाकतो. निर्दयी, निष्ठूर, निरंकुश सत्तेचा माज चढलेल्या माणसांकडून निरंतर होणारा अपमान आणि हिरव्यागार जगण्याचं डोळ्यादेकत होत जाणारं मातेरं बधून जीव सोडलेला बाप अधीकच अंतर्मुख करतो बघणाऱ्यांना ! जगण्याचे रीत रिवाज समजलेला संवेदनशील आजोबा जो निधड्या छातीनं मरणालाही निडरपणे सामोरा जातो, तेंव्हा... आता आपल्या प्रश्नांवर आपणंच उत्तरं शोधली पाहिजेत म्हणून अखेर हातात तांबी घेऊनच विकृत शोषण संस्कृतीचा विनाश करणारा नायक रौंदाळ मधून उभा राहतो तेंव्हा अत्यंत वाईट पद्धतीनं सामान्य मनुष्याच्या जगण्याचं नाक तोंड बंद करणा-या तमाम मालकांच्या पायाखालची वाळू सरकायला वेळ लागंत नाही. डोळ्यादेकत अवहेलना सहन न झाल्यानं बाप गेला, मर्यादा पुरुषोत्तम आणि समग्र समजूतदारपणाचा कळस असलेला संत संस्कारी आजोबाही मारला म्हणल्यावर जगून काय उपयोग आपला ? अशावेळी विवेकाला जे जे सुचेल ते सुंदरच. पर्यायच नाही कसलाच मनल्यावर मरु नाही तर मारु.हातपाय गाळून बसन्यात मजा नाही.प्राप्त परीस्थितीनं नको तेवढा छळ मांडल्यावर शेळ्या मेंड्यासारखं जगून तरी करायचं काय ? जिथं उजडंल तिथं उजडंल म्हणून हातात तांबी आणि डोक्यात अन्याया विरुद्ध प्रचंड चीड घेवून बिट्टूशेटशी भिडलेलं रांगडं पोरगं पहाणं जीवाचं पारणं फेडणारी गोष्ट वाटतं.

ज्याना रानं आहेत आणि रानात ऊस निसवून वाळंत चाललाय तरी कारखाना टोळ्या धाडून तोडून नेत नाही,आपुनंच तोडून न्यावा तर आठ आठ दिवस काटा करंत नाही,दिवस रात्र तिथंच पडून रहावं लागतं. मालकाचे आणि मालकाच्या मांजरांचेही नको नको ते बोलनेच खावे लागतात.हा सिनेमा त्यांनी वेळ काढून बघायलाच हवा. ज्यांचे कापसाचे भोदं रानात बोंडात, रस्त्याच्या कडंला बैलगाडीत, ट्र्याक्टरात अडकून पडलाय, ग्रेडर चाचपून सेकंड थर्ड क्याट्यागिरीत टाकायलाय मुद्दामुन, वजन्या काटा मारायलाय,अशा वेळी काय करावं अगतीक बापानं ? अशा पोरांनी हमखास हा सिनेमा बघायलाच हवा. ज्यांचं माळवं बेभाव चाललंय आडतीवर, न्हेन्या- आनन्याचाही खर्च निघंत नाही, स्वतःची मोलमजूरीचं सोडा, बियाभरणाचं तर दूरंच राहिलं अशा वेळी 'लाल चिखल' करुन आता कवर बघंत रहायचं हा ही वावराची माती करंतचाललंय. वावंर असो नाही तर वावराचा मालंक... व्यवस्थेनं बेहाल करुन टाकले आहेत घाम गाळणा-या माणसांचे.चार बुकं तेही नीट न शिकल्यामुळं ना धड स्वाभिमानानं जगता येतं ना व्यवस्थेच्या ताटाखालचं लाळघोटं मांजर होता येतं...

या अशा अस्तित्वाच्या प्रश्नांच्या भयंकरातून प्रवास करत असलेल्या समग्र अवहेलनांचं प्रतिनिधित्व करंत असलेली 'आपली माणसं' रौंदाळ मधून भेटतात तेंव्हा पिढ्यान् पिढ्याच्या दडपून ठेवलेल्या तमाम दुःखांना, पिकून सडू पाहणा-या बेंडांना, नासून किडे पडू पाहणा-या जखमांना आता आपणंच होवून निरपून काढून टाकायला शिकवणारा हा समर्पक धडा शिकवणारा 'रौंदळ' आहे !

वेळ काढा. शे-दोनशे जावू द्या. आसेही इथं तिथं लई बक्कळ खर्चीलाय आपण पैसा. पुस्तकं तर वाचणं होईनाय ना आपल्याला, व्याख्यानही ऐकायला वेळ नाही. तर मग एकदा बघाच हा सिनेमा. तुमच्या सगळ्या सन्मित्रांना दाखवा, बघायला सांगा. कुठलंच सरकार हा सिनेमा ट्याक्स फ्री करणार नाही, तो त्यांना तो परवडनारंच नाही. आपल्या गावाला सांगा बघायला, 'माहेरची साडी' गाड्या जुपून नाही का दावली माय बहिनींना तसं हा सिनेमा तमाम बापा-भावांना, माय बहिनींना बधू द्या राव. बघु द्या ना राव आपली गोची कशी कशी, कुठं कुठं, कोण कोण करुलालंय. आपले ऊसं वाळायलेत म्हणतोत ना जाग्यावर, आपले कापसं धूळ खात पडलेत वावरातच गठुड्यांनी, गाड्यांमधून रस्त्यावर, आज भाव येईल, उद्या भाव येईल म्हणून ढिगंच्या ढिगं बनमी रचून ठेवाव्यात कडब्याच्या तसे ताडपत-यात पांघरुन पडलेल ना ढिगं सोयाबिनचे वावारात.आपल्या दुःखाला कारणीभूत कोण लोकं आहेत ते एकदा दाखवा राव आपल्या पोराबाळांना. आपल्या गावानं फलान्या पक्षाला मतदान केलं नाही म्हणून जर येवढं सगळं सहन करावं लागंत आसंल तर मग हाती लागंल बघ्याचीच भूमीका घ्यायची, सहनंच करंत जायचं म्हणजे ती तमाम पुस्तकं फुकून द्यायची ज्यांनी स्वाभिमानी जीवन जगण्याचे धडे दिले.मातीचा मोहर माथ्यावर मिरवला. कायम 'हाताची घडी तोंडावर बोट' हे असलं दलिंदर शिक्षण आजवर आम्हीही नाही दिलं कुणाला.सहन करायला शिकवलं पण इतकंही नाही की नंतर स्वतःचंच तोंड स्वतःलाही दाखवता येणार नाही. लई दिसानं अगदीच अगतीकतेनं सहन करत चाललेल्या, जाग्यावर हातपाय गाळून शासनाच्या मदतींची अपेक्षा करत लाचार आयुष्य जगत राहिलेल्या माणसांच्या ठसठसना-या वेदनांना, असहनीय यातनांना, 'आता पर्यायच नाही' ही आवस्था गाटलेल्या अनुभूतीला साकारण्याचं मोठं काम टीम 'रौंदळ' ने केलं आहे. मरणाच्या उरात धडकी बसायला हवं असं मरण पाहताना माणसं मार, अजून मार, मरेस्तोर मार, माजोरी जमातंय मार, असं काहीसं मन मनंत रहातं म्हणजे काय ? करोडो माणसांच्या मुक्या मनाचा उद्‌गार होवून जेंव्हा या सिनेमातली माणसं बोलतात तेंव्हा ती आपल्याच मनातलं बोलंत चाललेत हे जानवंत रहातं. हे भावनेचं विरेचन होत रहानं कुण्याही मोठ्या कलाकृतीचं लक्षण असतं आणि ते या सिनेमानं कमावलं आहे. 'रोंदाळ' चा कथा, पटकथा लेखक आणि दिग्दर्शक गजानन नाना पडोळ, गीतकार आणि सरपंचाची भूमीका निभवलेला कवी विनायक पवार, नायकाची भूमीका बजावलेला भाऊसाहेब शिंदे, निरागस नायिका नेहा सोनवणे आणि संगीत हर्षित अभिराज आणि टीम रौंदळ ची सगळी मंडळी अभिनंदनास पात्र आहे.सामान्य माणसांच्या भावनेचं वाट मोकळी करुन देणारी ही कलाकृती आपण बघीतली नाही तर अशा अवघडल्या काळात आपलं खूप कांही राहून गेल्यासारखं आहे. मी भाषा आणि साहित्याचा प्राध्यापक आहे. जीवन मूल्यांची पाठराखण करत राहणं माझं काम आहे.जीवनमुल्यांचा इतका -हास होत चाललेल्या काळात तर या सिनेमाचं




प्रश्न आहेच. अशा प्रश्नांच्या पुढं काय ? पुढच्या वाटांसाठीही हा सिनेमा पहायलाच हवा. ज्यांना ज्यांना वावर आहे, विहिरी पाडल्यात आवसान काढून, बोर घेतलाय उसनवा-या करुन सवयीनं, दिडीनं आणि एक पारगीही लाईट रहात नाही रानात, आली तर तिला काळ वेळ नाही, कधीबी गुल.कसं करायचं माणसानं ? कसं,कधी भिजवायचं रान ? खळेदळे झाले, शेतक-याकडं मुबलक, शिलकीचा माल आला की हमखास बाजार भाव पडणार, पाडणार,राशीचं मातरं करणार.एकदा का मालटाल इकून वावरानं दोन्ही हात वर केले की आडत्या मालाचे भाव गगणाला भिडविनार. आडतीला घालाचं तवा भाव पाडून आणि घ्यायचं झालं की भाव वाढवून हे गणित सालोन् साल ते शस्त्र हातात घेवून कसा एक तरनाबांड स्वाभिमानी पोरगा आपल्या प्रश्नांवर उत्तरं शोधतो...यासाठी ही कलाकृती किमान एकदा तरी बघाच !

कुणाच्या मनाविरुद्ध नको तिथं बघणं पापंय. कुणाच्या परवानगी शिवाय नको तिथं हात लावणं पापंय. कुणाची हरकत असताना कुणाचं कांही उचलून नेनं खरंच पाप आहे.मनाचा कौल असताना यातलं काहीबी केलं तर बात वेगळी. एकदा... दोनदा... तिनदा...झालं ! गेलं ना डोक्यावरुन पाणी ?

तरी गपंच बसायचं ? तरी सहनंच करायचं ? ही असली सहनशीलता तर गौतम बुद्धालाही आवडायची नाही ना ! गांधीजीही गाल मागं घेतील राव. सतत कोणी आपमानंच करायलंय आणि आपण केवळ कुणीही संवेदनशील काळजाचा मनुष्य जोरकस समर्थनंच करेल.

कविवर्य विनायक ! सन्मित्रा !


या सिनेमातल्या सरपंचाच्या पाटाडात किमान एखादी तरी तांबी बसायला पाहिजे होतं राव !

तुझी या सिनेमातली गाणी या सिनेमातल्या नायक नायिकांचं निरागस प्रेम फुलवणारी असूनही परीस्थिती नायकाला हातात तांबी आणि फावडंच घ्यायला लावते, हे चित्र बदलन्यासाठी तुम्ही टीमनं सुचवलेल्या वाटा गावपातळीवर किमान या सिनेमाच्या माध्यमातून बघीतल्या जाणं फार गरजेची गोष्ट आहे.

***(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचं संशोधन मार्गदर्शक आहेत.)***

# समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात चिंताजनक

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

महाराष्ट्रासह देशात होणारे 85 टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर 15 टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात.देशातील अपघातांचा विचार केला तर प्रत्येक तासाला 18 लोकांचा अपघाती मृत्यू होत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. ज्याप्रमाणे वाहन चालकांसाठी रस्त्यांच्या सुविधा उपलब्ध झाल्यात त्याच गतीने अपघात मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.त्याचप्रमाणे राज्यात दिवसेंदिवस रस्ते अपघातामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा होत आहे. सरकारी आकड्यानुसार राज्यात दोन वर्षांच्या काळात विभिन्न क्षेत्रात 59597 रस्ते अपघात झालेत. यामध्ये 27000 लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते.जानेवारी 2022 ते नोव्हेंबर 2022 या कालावधीत रस्ते अपघातात 47793 लोक जखमी झालेत. ज्याप्रमाणे राज्यात किंवा देशात रस्त्यांच्या सुख-सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्याच गतीने अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आपले पुर्वज म्हणायचे जेवण सुख तेवढंच दुःख त्याचीच पुनरावृत्ती होत आहे की काय असे वाटते.आज सुखाच्या भोवऱ्यात आपल्याला दुःखाचा कळस पहायला मिळतो.राज्याच्या जनतेच्या सुविधांच्या दृष्टीकोनातून 701 किलोमीटर लांबीचा नागपूर ते मुंबई हा नागपूर द्रूतगती मार्ग ( समृध्दी महामार्ग ) बनविण्यात आला.या मार्गाचे लोकार्पण 11 डिसेंबर 2022 झाले.समृध्दी महामार्ग राज्याच्या दहा जिल्ह्यांतून जातो.त्याचप्रमाणे 390 वेगवेगळ्या खेड्यांना वळसा देवुन जातो.परंतु वाहन चालक आपल्या वाहनाच्या गतीवरील नियंत्रणात न ठेवता वाहन चालवितांना निदर्शनास आले आहे.त्यामुळे आतापर्यंत समृध्दी महामार्गवर 35 अपघात झाल्याचे सांगितले जाते ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.40 दिवसांत 20 अपघात म्हणजे दर दोन दिवसांला एक अपघात अशी परिस्थिती समृध्दी महामार्गावरील असल्याचे दिसून येते.समृध्दी महामार्गावरील वेगमर्यादा 120 किलोमीटर प्रति तास अशी आहे.यामुळे थोडीशी ही चुक मोठे अपघाताचे कारण ठरू शकते व ठरत आहे.समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात पहाता सरकारने ठोस पावले उचलण्याची नितांत गरज आहे.याकरिता प्रत्येक 50 किलोमीटर अंतरावर थांबे आवश्यक आहेत.कारण इंजिन गरम होणे,टायर गरम होणे यामुळे होणारे अपघात यावर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल व वाहन चालकांना विश्रांती मिळेल आणि अपघात टाळता येईलरोडचे काम सुरू असताना वनवे ट्राफीक असते अशाच ठिकाणी अपघाताचे प्रमाण सुध्दा जास्त दिसून येते. अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढल्याचे आपण पहातो.कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या कामानिमित्त किंवा नौकरीवर जात असतो.परंतु वाढते रोडचे अपघात पहाता प्रत्येकामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होने सहाजिकच आहे. यावरून स्पष्ट होते की घरून निघालेला व्यक्ती वापस घरी सुखरूप पोहचेलच याची काहीही हमी नसते ही बाब सध्याच्या होणाऱ्या वाढत्या अपघातावरून लक्षात येते.

# गृहिणीकडे आश्रित व्यक्ती म्हणूनच का पाहिले जाते ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**अलीकडेच पीडित महिला गृहिणी असल्याच्या कारणावरुन रस्ता अपघातग्रस्त म्हणून तिला नुकसान भरपाई नाकारल्याच्या कारणावरून केरळ उच्च न्यायालयाने केरळ राज्य मार्ग परिवहन महामंडळावर ताशेरे ओढले आहेत. ती एकही पैसा कमवत नाही, त्यामुळे ती अपंगत्वाची भरपाई आणि इतर सुविधांसाठी पात्र नाही, असं महामंडळाचं म्हणणं होतं. न्यायालयाने हा युक्तिवाद निंदनीय आणि अनाकलनीय असल्याचे म्हटले आहे. अपघाताची भरपाई गृहिणी आणि नोकरदार महिलेसाठी सारखीच असावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. गृहिणीही आपला पूर्ण वेळ आपल्या कुटुंबाला देतात. या प्रकरणी न्यायालयाने गृहिणीची राष्ट्रनिर्माता असल्याची आपली भूमिका स्पष्ट करत चांगली भरपाई देण्याचे आदेश दिले.**

खरं तर, आपल्या देशात महिलांना घरच्या आघाडीवर सर्व काही सांभाळूनदेखील काहीही न करण्याच्या भूमिकेत पाहणे सामान्य गोष्ट आहे. घराच्या जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या या महिलांचे उत्पन्न आर्थिक दृष्टीने मोजले जात नसल्यामुळे त्यांचे कष्ट, घरासाठीची धडपड आणि योगदान याकडे दुर्लक्षच होताना दिसते.

सामाजिक-कौटुंबिक वर्तनापासून ते स्त्रियांसाठी बनवलेल्या धोरणांच्या आणि योजनांच्या आराखड्यापर्यंत त्यांना हीन समजण्याच्या या विचारसरणीचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळेच गृहिणींसाठी कुठेही विशेष तरतूद दिसून येत नाही. वास्तविक गृहिणी स्वतःपेक्षा आपल्या प्रियजनांना आणि त्यांच्याशी जुडलेल्या नात्याला जास्त प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत 'आई आणि पत्नी म्हणून तिचे योगदान अमूल्य आहे' हे गृहिणीच्या भूमिकेवर न्यायमूर्तींचे विधान खरोखरच विचार करण्यासारखे आहे. स्त्रियांची ही वरवर सामान्य वाटणारी भूमिका विशेष दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे, असा त्याचा थेट संदेश आहे. विशेष म्हणजे 2020 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने एका महिलेचा रस्ता अपघातात मृत्यू झाल्यास तिच्या कुटुंबीयांना भरपाई देण्याचे आदेशही दिले होते. न्यायालयाने वाहन अपघात न्यायाधिकरणाचा आदेश रद्द केला होता, ज्यामुळे महिलेच्या कुटुंबाला ती गृहिणी असल्याच्या कारणावरुन भरपाई नाकारली होती. तेव्हाही न्यायालयाने अत्यंत संवेदनशील टिप्पणी केली होती की, 'गृहिणी म्हणून स्त्रीची भूमिका ही कुटुंबातील सर्वात महत्त्वाची आणि आव्हानात्मक असते. किंबहुना ती भावनिकदृष्ट्या कुटुंबाला एकत्र ठेवते.ती घरात तिच्या पतीसाठी आधारस्तंभ आहे, तिच्या मुलांसाठी मार्गदर्शक आहे आणि कुटुंबातील ज्येष्ठांसाठी आधार आहे. एकही दिवस सुट्टी न घेता ती रात्रंदिवस काम करते, मग ती नोकरदार महिला असो वा नसो. मात्र, तिने केलेल्या कामाचे कौतुक केले जात नाही आणि नोकरी म्हणून तिच्या कामाचा विचार केला जात नाही. शेकडो घटकांनी बनलेल्या घराला स्त्रीने दिलेल्या सेवांचे आर्थिक दृष्टीने परिमाण करणे अशक्य आहे. कोरोनाच्या काळात गृहिणींनी केवळ स्वतःच्याच नव्हे तर आजूबाजूच्या लोकांनाही मदत केल्याची अनेक उदाहरणे समोर आली होती. घरापुरतेच बंदिस्त असलेल्या जीवनातील अडचणीच्या काळातही घरातील महिलांनी प्रत्येक संकटाशी झुंज देताना आपल्या जवळच्या लोकांची आणि प्रियजनांची काळजी घेतली होती.



किंबहुना, न्यायालयीन प्रकरणात केलेल्या या टिप्पण्या समाजाला आणि कुटुंबालाही सावध करणाऱ्या आहेत. घरगुती महिलांच्या सहभागाबद्दल खऱ्या अर्थाने जागरूक करते. निःसंशयपणे, कामगारांची होणारी उपेक्षा आणि निष्काळजी वागणूक याच्या आघाडीवर संपूर्ण समाजात जागरूकता आणि संवेदनशीलतेची गरज आहे. असं असलं तरी विविध संस्था, संघटनांपासून घरातील महिलांच्या नातेवाइकांपर्यंत प्रत्येकाने आपल्या या संकुचित भूमिकेची तपशीलवार जबाबदारी समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी अशाच एका प्रकरणात गुवाहाटी उच्च न्यायालयाने म्हटले होते की, 'गृहिणी काम करत नाहीत किंवा घराला आर्थिक हातभार लावत नाहीत ही कल्पनाच समस्याप्रधान आहे.अशी समज अनेक वर्षांपासून प्रचलित आहे आणि ती दूर केली पाहिजे.' गृहिणीची बहुआयामी भूमिका नीट समजून घेतल्याशिवाय तिच्या वाट्याला सहकार्य आणि आदर मिळू शकत नाही हे समजणे तसे अवघड नाही. अशा स्थितीत निष्काळजी वर्तनामुळे त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष त्यांच्या अभिमानाला आणि मनोबलाला धक्का पोहोचवते. असे असूनही, प्रिय व्यक्ती आणि अनोळखी लोकांची ही वृत्ती जगातील प्रत्येक प्रदेशातील गृहिणींच्या वाट्याला येते. वास्तविक सत्य हे आहे की त्यांच्या न मिळालेल्या कामाचे मूल्य मोजणे जवळजवळ अशक्य आहे. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या 2021 च्या अहवालात असे नमूद केले आहे की जगातील स्त्रिया एकूण तासांपैकी सत्तर टक्के तास बिनपगारी घरगुती कामासाठी घालवतात. तर आशियाई देशांमध्ये हा आकडा ऐंशी टक्क्यांहून अधिक आहे. आपल्या देशात अशा महिलांची लोकसंख्या सुमारे वीस कोटी आहे. त्यांच्या न भरलेल्या घरगुती कामाचे आर्थिक मूल्यांकन दर महिन्याला सरासरी चाळीस हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचते. त्याच वेळी, ऑक्सफॅमच्या 'टाइम टू केअर' अहवालात असे म्हटले आहे की जगातील निम्मी लोकसंख्या वर्षाला सुमारे दहा हजार अब्ज डॉलर्सचे बिनपगारी घरगुती काम करते. अशा परिस्थितीत त्यांच्या सहभागाचे मूल्य समजून घेणे आणि स्वीकारणे आवश्यक आहे. गृहिणींकडे केवळ आश्रित व्यक्ती म्हणून पाहिले जाते हे कटू सत्य आहे. कामाच्या आघाड्यांवर आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि व्यस्त कुटुंबातील सदस्यांचे जीवन त्यांच्या वाट्याला आले आहे. त्यांच्या जबाबदाऱ्या घेण्याच्या व्यस्ततेमुळे कामाच्या ठिकाणी त्यांची उत्पादकता कमी होईल.

अशा प्रकारे प्रत्येक गृहिणी अप्रत्यक्षपणे कमाईच्या कार्यात सहभागी होत असते. मात्र, ते समजून घेण्याची जाणीव आजही हरवत चालली आहे. त्यामुळेच आता जगाच्या प्रत्येक भागात महिलांच्या देशांतर्गत आघाडीवर उभ्या असलेल्या भूमिकेच्या आर्थिक मूल्यमापनाची चर्चा सुरू आहे. गेल्या वर्षी, चीनमध्ये एका घटस्फोटाच्या प्रकरणात एक निर्णय खूपच चर्चेत आला होता. त्यात न्यायालयाने म्हटले की, लग्नानंतर महिलेने पतीच्या घरी पाच वर्षे काम केले, त्यामुळे तिला पाच लाख रुपये नुकसानभरपाई मिळावी. तो आदेश ऐतिहासिक मानला गेला. त्यानंतर घरातील कामांसाठीच्या मजुरीबाबत वाद सुरू झाला. जगातील प्रत्येक देश, प्रत्येक समाज आणि प्रत्येक कुटुंबाशी संबंधित हा संवेदनशील विषय आहे. किंबहुना असंख्य जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या गृहिणीच्या या कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक सहभागाकडे होणारे दुर्लक्ष अनेक आघाड्यांवर वेदनादायी असते. या दुर्लक्षामुळे गृहिणींमध्ये नैराश्य आणि आत्महत्येचे प्रमाणही वाढत आहे. त्यांच्या श्रमाचा आणि सहभागाचा सन्मान न मिळाल्यानेही अपराधीपणाला जन्म मिळतो. परिणामी अनेक शारीरिक, मानसिक आजारही त्यांना घेरतात. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोनुसार, 2019 मध्ये रोजंदारी कामगारांनंतर आत्महत्या करणाऱ्यांमध्ये गृहिणींची संख्या सर्वाधिक राहिली आहे. अशा स्थितीत त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी संपूर्ण समाजाने या भेदभावाच्या मानसिकतेतून बाहेर पडणे गरजेचे आहे. त्याच्या कष्टाळू व्यक्तिमत्त्वाची आणीबाणी समजून घेणे आवश्यक आहे. घरात बंदिस्त असलेल्या महिलांची मनःस्थिती समजून घेण्यासाठी वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. घरातल्या प्रत्येकाचे मन समजून घेणाऱ्या महिलांना समाज आणि कुटुंबाचा पाठिंबाही आवश्यक असतो. यामुळेच असे न्यायालयीन निर्णय समाजासाठी महत्त्वाचे संदेश देऊन जातात. नवीन चर्चांना जन्म देते.

# भारतात होळी साजरी करण्याच्या विविध परंपरा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**होळी हा रंगांचा सण आहे. रंगांशी खेळण्यासाठी आपण सर्वजण आतुरतेने वाट पाहत असतो. होळी हा भारतातील महत्त्वाचा सण असल्याने तो उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. होळी हा सण एकच असला तरी तो सर्वत्र वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की दक्षिण भारतातील लोक उत्तर भारतातील लोकांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात. एकूणच, एकच सण साजरे करण्याची ही मनोरंजक विविधता भारताला विविधतेचे प्रतीक बनवते. भारतातील होळी साजरी करण्याच्या विविध विचित्र आणि परंपरां.ज्या जाणून आपण देखील आश्चर्यचकित व्हाल.**

**लाठमार होळी, बरसाना –**
बरसाणे यांची लाठमार होळी खूप प्रसिद्ध आहे. या निमित्ताने लोकांनी इथे यावे आणि लोक या परंपरेचे पालन कसे करतात ते पहावे. हे ठिकाण मथुरेपासून २७ किमी अंतरावर आहे. येथे होळी केवळ रंगांनीच नाही तर काठ्यांनीही खेळली जाते. असे म्हटले जाते की बरसाना येथे भगवान कृष्णाने राधाचा पाठलाग केला, त्यानंतर तिच्या मित्रांनी भगवान कृष्णाचा काठीने पाठलाग केला. तेव्हापासून येथे महिला पुरुषांचा काठीने पाठलाग करतात

**योसांग, मणिपूर –**
मणिपूरमध्ये होळीचा सण पाच दिवस साजरा केला जातो. जो यावल शुंग या नावाने ओळखला जातो. या दिवशी लोक भगवान पखंगबाला वंदन करतात. सूर्यास्तानंतर, लोक यासोंग मैथबा नावाची झोपडी जाळण्याच्या विधीसह या उत्सवाची सुरुवात करतात. हे नाकथेंग परंपरेचे पालन करते, जिथे मुले घरोघरी देणगी गोळा करतात. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी मुली दान मागतात. तर चौथ्या आणि पाचव्या दिवशी एकमेकांना रंग लावून अनोख्या पद्धतीने होळीचा सण साजरा केला जातो.

**होला मोहल्ला, पंजाब**
पंजाबमध्ये होळीनंतर एक दिवस शीख धर्मीयांकडून होला मोहल्ला साजरा केला जातो. दहावे शीख गुरु गुरू गोविंद सिंग यांनी समुदायातील युद्ध कौशल्य विकसित करण्यासाठी होला मोहल्ला उत्सव सुरू केला. ती येथे योद्धा होळी म्हणून ओळखली जाते. येथे योद्धे आपले पराक्रम दाखवण्यासाठी स्टंट करतात.



**मंजुल कुली, केरळ –**
दक्षिण भारतात होळी हा सण उत्तर भारतात तितक्या धूमधडाक्यात साजरा केला जात नसला तरी काही समुदाय हा सण साजरा करतात. केरळमध्ये होळीला मंजुळ कुली म्हणून ओळखले जाते. येथील गोसारीपुरम तिरुमाच्या कोकणी मंदिरात रंगांचा हा सण साजरा केला जातो. होळीच्या पहिल्या दिवशी लोक मंदिरात जातात आणि दुसऱ्या दिवशी सर्वजण एकमेकांवर हळदीचे पाणी शिंपडतात आणि लोकगीतांवर नाचतात.

**शिग्मो, गोवा –**
गोवा हे खुद्द मौजमजेचे शहर आहे. होळीचा सणही येथील लोक मोठ्या थाटामाटात साजरा करतात. येथील लोक पारंपारिक लोकनृत्य आणि पथनाट्य सादर करून या उत्सवाचा आनंद घेतात. शिग्मो उत्सवाचे दोन प्रकार आहेत. धतोक शिग्मो आणि वडलो शिग्मो. ग्रामीण लोक धतोक शिग्मो साजरे करतात तर सर्व वर्गातील लोक वडलो शिग्मो साजरा करतात.

**रंगपंचमी, महाराष्ट्र –**
महाराष्ट्रात रंगपंचमीची धूम असते.महाराष्ट्रात या दिवशी पुरणपोळी बनवली जाते. खासकरुन मासेमारी करणाऱ्यांच्या वस्तीत या दिवशी होळी साजरी केली जाते. नाचणे-गाणे अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. काही ठिकाणी माठ फोडण्याच्या कार्यक्रमाचंही आयोजन केलं जातं. मासेमारी करणारा समाजात हा दिवस लग्न ठरवण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो.

महाराष्ट्रात होळी खूप वेगळ्या आणि मनोरंजक पद्धतीने साजरी केली जाते. होलिका दहनानंतरच्या दुसऱ्या दिवशी या उत्सवाला रंगपंचमी म्हणतात. या दिवशी लोक एकत्र येतात आणि एकमेकांना गुलाल लावतात. या दिवशी इथल्या प्रत्येक घरात पुरणपोळी खास बनवली जाते. या काळात तुम्ही इथे असाल तर नक्कीच त्याचा आस्वाद घ्यावा.

# होळी सणाची शिकवण



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**होळीच्या तसेच रंगपंचमीच्या सर्वांना हार्दिक, हार्दिक शुभेच्छा होळी हा सण हिंदू धर्मातील प्रमुख सण आहे आणि सर्वाचा आवडता सण आहे. संपूर्ण भारत देशभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गेल्या दोन वर्षाच्या कोरोना काळात होळीचा सण साजरा करताना कोणीही दिसून आले नाही. कोरोना नावाचा महाभयंकर संकट एकवेळचा निघून गेला आणि तो पुन्हा कधीच येऊ नये असे सर्वांना वाटत असते कारण त्याने सर्वाच्या जीवनातील रंग तर घेऊनच गेला पण हसत्या, खेळत्या कुटुंबाला कायमचा रडवत ठेवून निघून गेला ही महा भयंकर परिस्थिती आपण सर्वजण जवळून बघितले आहे.**

होळी सणाची कथा सर्वांना चांगल्याप्रकारे माहीतच आहे कारण, प्रत्येक माणूस जरी सर्वगुणसंपन्न असला तरी एक दुर्गून माणसात असल्याने अख्खं जीवनच संपवून टाकतो होलीकेचं सुद्धा तसच झाले असत्याचा नाश झाला आणि शेवटी सत्याचा विजय झाला भक्त प्रल्हाद संपूर्ण विश्वात पुज्यनिय झाला ह्या, कथेतून सर्वजण शिकायला पाहिजे.

आपण ज्या गावात, शहरात किंवा मोहल्यात राहतो तिथे दरवर्षी होळी पेटवण्यासाठी मोठ्या आनंदाने एकत्र येत असतो , सोबत पुरणपोळीचा नैवध्य घेऊन मिळून, मिसळून मोठ्या आनंदाने होळीची पूजा, अर्चना करत असतो व होळी पेटविल्या नंतर एकमेकांना गुलाल, रंग लावुन होळीच्या शुभेच्छा देत असतो ही सर्वात असलेली एक प्रकारची आपुलकी, स्नेह ,जिव्हाळा आहे अशीच आपुलकी कायम राहण्यासाठी सदैव मिळून, मिसळून रहायला पाहिजे, मनात कोणाविषयी द्वेष, वाईट विचार, राग, भेदभाव, तिरस्कार असेल तर पेटत्या होळीत त्याच क्षणी जाळून टाकायला पाहिजे कारण, होळी सण आपल्याला त्याच प्रकारची शिकवण देत असतो. अशाच प्रकारचे वागणे किंवा आपुलकी, माणुसकी, स्नेह असणे गरजेचे आहे तरच माणूस, माणसापासून कोसोदूर जाण्याचा प्रश्नच येणार नाही. यासाठी होळीची शिकवण आत्मसात करून आचरणात आणणे तेवढेच आवश्यक आहे. तसेच होळी पेटवण्यासाठी हिरवेगार झाडे कधीही तोडू नये, नको ते पाप करू नये त्यापेक्षा आपल्या परीसरात साचलेला कचरा असेल तर...एकत्रीत करून त्याची होळी पेटवावी, आपलाच परीसर स्वच्छ व सुंदर दिसेल.. .जेणेकरून बिमाऱ्या कमी होतील. हे सर्व घडवून आणणे प्रत्येकांची जबाबदारी आहे.

त्याच प्रमाणे होळी सणाचा दुसरा दिवस म्हणजेच रंगपंचमी या दिवसाची तर वर्षभरापासून सर्वजण आतुरतेने वाट बघत असतात खास करून रंगपंचमी हा दिवस लहान मुलांना जास्तच आवडत असतो तेवढाच मोठ्या माणसाना सुद्धा आवडत असतो म्हणून सर्वजण आनंदीत असतात, एकमेकांना रंग लावुन शुभेच्छा सुद्धा देतात, पण काही वर्षाच्या आधी गावखेड्यात राहणाऱ्या लहान मुलांचे जरा वेगळेच होते आणि काही ठिकाणी आजही आहे लहान मुले रंग बणविण्यासाठी पळसाची फुले जमा करून एका मातीच्या भांड्यात भिजवून ठेवत असत बांबूपासून तयार केलेली केलेली पिचकारी किंवा दुकानात



मिळणारी तीन रुपयाची पिचकारी घेऊन त्याच पिचकारीने अख्खं दिवसभर रंग खेळत असत हे काही वर्षापूर्वी गेलेले दिवस व आठवणी आहेत, कारण ते रम्य बालपण होते, आनंददायी उत्साही जीवन होते सोबतच गावातील काही विनोदी लोक बाईची वेषभूषा, किंवा इतर वेषभूषा करून वाजत, गाजत सिमग्याचा भोजारा द्या म्हणुन घरोघरी व गावभर फिरत असत ते क्षण हसते, खेळते रंगपंचमीचे दिवस होते. गावखेड्यात बघायला मिळायचे पण, ते सुद्धा हळूहळू कमी दिसायला मिळत आहे . रंगपंचमी च्या दिवसाची आपण जशी आतुरतेने सर्वजण वाट बघत असतो तसच प्रत्येकांच्या जीवनामध्ये रंग भरायला विसरू नका, आपुलकी, स्नेह, प्रेम द्यायला विसरू नका, होळी कडून जेवढी आपल्याला शिकवण मिळते तेवढीच शिकवण सुद्धा रंगपंचमी देत असते आपल्या कडून कोणतेही वाईट घडणार नाही किंवा कोणाचा अपमान होणार नाही याची काळजी घ्यावी. होळीचा सण सर्वानी आनंदाने साजरा करावा जेणेकरून निसर्गाला सुद्धा आनंद झाला पाहिजे, सोबत मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करावे प्रेम, द्यावे, प्रेम घ्यावे होळीची आणि रंगपंचमीची शिकवण सदैव आपल्या आठवणीत ठेवावे. दरवर्षी येणाऱ्या या सणाचे भरभरून स्वागत करावे पण, गोर, गरीबांच्या जीवनात रंग भरायला किंवा त्यांची मदत करायला विसरू नये रंगपंचमीच्या दिवशी पाच तरी मिनिटे त्यांच्यासोबत घालवावे नक्कीच कुठेतरी आपल्याला वेगळेपणा जाणवेल व होळी सणाकडून आपल्याला काही तरी शिकल्यासारखे वाटेल..फक्त माणुसकीच्या नात्याने तरी आपल्याला एवढे तरी करता आले पाहिजे.

# होळी म्हणजे ग्रामशुद्धिदिन



भगवान राईतकर
संपर्क क्र. ९७३०३३२१५१

आधुनिक केसरी

**आपणास मनाची शुद्धता आणि शरिराची शुद्धता माहीत आहे. आध्यात्मिक साधनेतून माणसाला मनाची शुद्धी करता येते तर, साबणाने मानवी शरिराला शुद्ध करता येते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता या युग ग्रंथात ग्रामशुद्धी सांगितली आहे . ग्रामशुद्धी म्हणजे स्वहित, समाजहित आणि राष्ट्रहित साधण्याचा आणि उन्नतीचा एक शास्त्रशुद्ध मार्ग होय .यामध्ये राष्ट्रसंतांनी सणाचे, दिनाचे आणि उत्सवाचे ऐतिहासिक पावित्र बाजूला जावून विडंबन कसे झाले आणि त्यातून मूळ हेतुला तडा कसा गेला याविषयी वर्णन केले आहे.**

होळी हा ग्रामशुद्धिदिन आहे, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात. त्यासोबतच ज्या दिनाचा उल्लेख केला त्यामध्ये मातृदिन , बालकदिन, श्रमिकदिन, मानवतादिन, स्वातंत्र्यदिन आणि कितीतरी .. तो असा आहे . याविषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीता या ग्रंथातील सणोत्सव या तेविसाव्या अध्यायातील ८६ व्या ओवीत सांगातात की, **होळी म्हणजे ग्रामशुद्धिदिन ।तैसेचि मातृदिन, बालकदिन ।श्रमिकदिन ,मानवतादिन ।स्वातंत्रदिनादि कितीतरी ॥**

वर्तमान काळात होळी साजरी करण्याच्या पद्धतीत भांडण, मारामारी, लोकांची इभ्रत काढणे , मान- सन्मान न ठेवता गावातील आणि शहरातील रस्त्याने वेड्यासारखे पळत सुटणे अशा बाबी आपणास पाहावयास मिळतात , याचा उल्लेख ग्रामगीता ग्रंथातील खालील ओवीत आला आहे की ,

**होळीचा आला शिमगा सण ।त्यात मोठी मारहाण ।लोक इभ्रत, मान सोडोन ।पळती मार्गी वेडेसे ॥**

अशाप्रकारे या सणामध्ये विचित्रपणा वाढला आहे. खरा शिमगा असा नाही . त्यामध्ये तत्व आहे , एक तात्विकपणा आहे. त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी करून घेण्याची समाजाला गरज आहे .समाजाने या सणातील तात्विकपणा घेण्याचा विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतील पुढील ओवीत विशद केला आहे.

**हा वाढला विचित्रपणा ।ऐसा नोहे शिमगा जाणा ।त्यातही आहे तात्त्विकपणा ।घेण्यासारिखा समाजा ॥**

होळी या सणाविषयी अशी कथा आहे की , या दिवशी भक्त म्हणून जे आपल्याला परिचित आहे ,असे भक्त प्रल्हाद त्यांचा या दिवशी छळ झाला .पण , हरिभक्त म्हणून त्यांच्या प्राणाला दुःख झाले नाही . याचा संदर्भ आपल्याला ग्रामगीतेतील पुढील ओवीतुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देतात की ,

**याच दिवशी प्रल्हादाची छळणा ।केली होती होळीने जाणा ।परि दुःख न झाले प्रल्हादप्राणा ।हरिभक्त म्हणोनि ॥**

भक्त प्रल्हादाचा छळ करणाच्या उद्देश्याने होळीचे ज्यांनी नियोजन केले होते ते कपटी, स्वार्थी आणि स्वहितदक्ष माणसे जळाली . याचा उपहास म्हणून लोक त्यावेळी ओरडले होते . त्यामधून त्यांनी असत्याचा, कपटी माणसाचा पराभव होतो आणि सज्जनांचा विजय होतो हे दाखविण्यासाठी आवाज केला होता . उपहास म्हणजे टिंगल होय. यामधून दुर्जनाची टिंगल केली आणि या होळीत जाळणारे जळाल्यामुळे लोकांना कौतुक झाले. याविषयी ग्रामगीतेतील पुढील ओवीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात की , **शेवटी छळणारेचि जळले ।हे गावासि कौतुक झाले । म्हणोनि जन ओरडले ।उपहास त्यांचा करोनि ॥**

या दिवसाचे महत्व असे की , या दिवशी भगवान शंकराने काम देवाला आपल्या तिसऱ्या नयनाने जाळले . या कामाचा धिक्कार नोंदविण्यासाठी भूतसेनेने या दिवशी हल्लकल्लोळ केला , मोठा आवाज केला . असा उल्लेख ग्रामगीतेतील पुढील ओवीत आला आहे .

**त्याच दिवशी शंकराने ।काम जाळिला तिसऱ्या नयने । म्हणोनि कामास धिक्कारिले भूतसेनेने ।हलकल्लोळ करोनि ॥**

या दिवशी गावातील सज्जनांनी एका वार्षिक यज्ञाची आखणी केली, नियोजन केले . त्यामध्ये त्यांनी सर्व गाव साफ करून त्यातील कैचण ,कचरा पेटवून देण्याची योजना बनविली...म्हणजे ग्राम स्वच्छतेचे नियोजन केले . सज्जनांच्या संघटनेतूनच विकास साधता येतो , असा मौलिक संदेश पुढील ओवीतून आपणास मिळतो .

त्याच दिवशी सज्जनांनी । वार्षिक यज्ञाची केली आखणी ।
संपूर्ण गाव साफ करोनि । द्यावे पेटवोनि कैचण ते ॥

गावातील कैचण पेटवून दिल्यानंतर गावातील सर्वांनी त्या पेटवून दिलेल्या कैचणाच्या प्रकाशात एकत्रित जमण्याचा संदेश महाराज देतात . त्याठिकाणी प्रत्येकांनी आपले दुष्कृत्य सांगावे . मला त्या दुष्कृत्याचा अनुताप झाला आहे ,असे सांगावे . अनुताप म्हणजे पश्चाताप होय . ग्रामसफाई सोबतच दुष्कृत्याची होळी करण्याचा , नायनाट करण्याचा हा दिवस असल्याचा बोध ग्रामगीतेतील पुढील ओवीतून होतो .

त्याच्या प्रकाशी सर्वांनी जमावे । आपले दुष्कृत्य निवेदावे । पुढे तैसे न करण्याचे योजावे । अनुतापाने ॥

पश्चाताप करण्याचे काही लोकांचे मनोधैर्य कमी पडल्यामुळे दुसरे लोक त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी ओरडले. असे करून गावातील अस्वच्छता आणि व्यसनाधिनता या सारखी पापे धुवून काढली असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेतील पुढील ओवीत सांगतात की,

हे मनोधैर्य कमी पडले । म्हणोनि दुसरे जन ओरडले । गावाचे पाप धुवोनि काढले । ऐसियापरी ॥

गावात एक आदर्श निर्माण व्हावा . गावातील सर्व लोक निर्व्यसनी व्हावेत , गावातील दुष्कृत्य हे लोकांच्या अनुतापाने नष्ट करण्यासाठी सज्जनांनी योजना आखली होती . पण , पुढे त्याचा विपर्यास झाला . परस्परांना मनोबल देण्यासाठी ओरडण्याची परंपरा विसरले आणि आपसात शिवीगाळ द्यायला लागले .या सणाचे मुळ न जाणता अभद्र बोलण्याचे काही पोथ्या सांगत असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुढील ओवीत सांगतात की ,

पुढे याचा विपर्यास झाला । शिवीगाळ देती परस्पराला ।
पोथ्याहि सांगती 'अभद्र बोला' । मूळ त्याचे न जाणता ॥

काही लोकांचे म्हणणे असे आहे की , वर्षातून एक दिवस शिव्यासाठी आहे . अशी म्हणणाऱ्या माणसांना शिव्यासाठी वर्ष कमी पडते ? एक वाक्य संपले की , शिवी देणारे काही महाशय आपण आपल्या अवती- भवती अनेकदा पाहतो ? यातून दुर्जनांना उत्तेजन मिळते . सज्जनाला त्याचे काय कारण आहे . याविषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुढील ओवीत सांगतात की ,

म्हणती कोणी वर्षातून । शिव्यासाठीच एक दिन ।
परि सज्जनासि याचे काय कारण ? । ये उत्तेजन दुर्जना ॥

होळी या सणात मुख्य म्हणजे धूलिवंदन होय . धूलिवंदन हे ग्रामसफाईचे प्राचीन चिन्ह असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात. धूलिवंदनातून सामाजिक एकात्मता ग्रंथातून सांगितली असल्याचे पुढील ओवीतून लक्षात येते की ,

या सणी मुख्य धूलिवंदन । जे ग्रामसफाईचे प्राचीन चिन्ह ।
अस्पृश्यांनाहि स्पर्शावे म्हणून । सांगितले ग्रंथी त्या दिवशी ॥

होळी हा सण कसा साजरा करावा ? या विषयी सांगतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की , अगोदर सार्वजनिक अग्निपूजन करावे . प्रज्वलित झालेल्या अग्नीत गावकऱ्यांनी आपल्यातील वाईट वृत्तीचे दहन करावे . अग्निपूजनातून तयार झालेली राख पुर्णपणे उकिरड्यावर घेऊन जावी . त्यानंतर सामुदायिक स्नान करावे .येथे सामुदायिक म्हणजे सर्वांनी असा आहे.

आधी सार्वजनिक अग्निपूजन । त्यात वाईट वृत्तीचे दहन ।
मग राख न्यावी उकिरडी पूर्ण । करावे स्नान समुदाये ॥

अशा प्रकारे होळी साजरी करून आपण ग्रामसेवेचा आनंद घेऊन एकमेकांना ,सर्व ग्रामस्थांना ग्रामसेवेचा सुगंध लाविला जातो. यातून प्रसन्नता प्रगट व्हावी यासाठीच हा होळीचा प्रसंग रंजक असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेतील पुढील ओवीत सांगतात की ,

ऐसा ग्रामसेवेचा आनंद । त्याने परस्परा लाविला सुगंध ।
प्रसन्नता दाखवाया विशद । योजिला प्रसंग रंजनाचा ॥

आपण सर्वजण ग्रामसेवेचा आनंद घेण्यासाठी व्यसनमुक्त होळी करूया ! होळीचा खरा अर्थ समजून आदर्श गाव , आदर्श समाज आणि आदर्श राष्ट्रानिर्मितीच्या राष्ट्राकार्यात आपला सहभाग नोंदवून राष्ट्रभक्ती दाखवू या !

**(लेखक संत साहित्याचे अभ्यासक व व्याख्याते आहेत)**



# अवघा रंग एक झाला !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**रंग शब्द उच्चारताच अनंत रंगीबेरंगी कल्पना अक्षरशः मनःपटलांवर गर्दी करू लागतात! दर्दी विचार क्षणात गर्दी करायला लागतात! रंग जन्माचा, रंग मृत्यूचा, रंग क्रांतीचा, रंग जीवनाचा, रंग प्रेमाचा! संपूर्ण श्रुष्टीचा कुंभ अनंत रंगांनी शिगोशिग भरून ओसंडून वाहणारा असा हा रंगारंग रंग! या शब्दाने भल्याभल्यांना वेड लावले आणि अनेकांचे आयुष्यही रंगारंग करून टाकले. रंग नाही असा भाव नाही, रंग नाही असा जीव नाही, रंग नाही असा ठाव नाही, रंग नाही असा देव नाही, रंग नाही तर काहींच नाही!**

रंगांची किमया माणसाला निसर्ग रंग पाहूनच सुचली! दिवसाची सुरुवात पूर्वेला अनंत रंगीबेरंगी रंगांची उधळण होऊन होते! सूर्योदय म्हणजे एक मनोहर दृष्य! संपूर्ण सृष्टी रात्रभर काळ्याकुट्ट रंगाची चादर पांघरलेली असतांना पहाटे पहाटेला सूर्यदेव क्षणार्धात ही चादर काढून तिथे अनंत छटांनीयुक्त, रंगीबेरंगी रंगांची झालर घेऊन येतात! सूर्योदय म्हणजे जीवनाला मिळालेला अनंत रंगी जणू नितांत सुंदर आरसाच! सूर्योदय होतो आणि निसर्ग मनोमन हलायला-डुलायला लागतो. सगळीकडे रंगीबेरंगी रंगांची उधळण आणि सुरांची सुमधुर वीणा झणत्कारते!

**हिरवा निसर्ग हा भवतीने**
**जीवन सफर करा मस्तीने**
**मन सरगम छेडा रे**
**जीवनाचे गीत गा रे, गीत गा रे धूंद व्हा रे**

आणि त्यातून असे रंगारंग वाङ्मय जन्म घेते! निसर्गाचा हा अनंत रंगाचा सर्वांगसुंदर आरसा आपल्याला इथल्या जग-जीवनाचे दर्शन घडवतो! सकाळी सकाळी हा एक रंगारंग सोहळा संपन्न होतो आणि सुरु होतात माणसे आपला रंग दाखवायला!

हे लिहायचे म्हणजे आज वर्षातील एकमेव रंगीबेरंगी सण म्हणजे रंगपंचमी-धुळवड! फाल्गुन या शेवटच्या मराठी महिन्याची सुरुवात या पाच दिवशीय रंगारंग उत्सवाने होते. रंग खेळायला, लावायला आणि बदलायला कुणाला आवडत नाही ? इथे निसर्ग, सृष्टी, प्राणी, झाडं आणि सर्वांचा कळस म्हणजे या सर्वांपेक्षाही माणसं मोठ्या शिताफीने रंग बदलतात. एवढे होऊनही शेवटी

**रंगात रंगुनी साऱ्या रंग माझा वेगळा**
**गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा वेगळा**

असे लिहायला माणसं मोकळी असतात. हीच तर या रंगांची अलौकिक किमया म्हणावी लागेल! जीवन मोठे रंगीन आहे. सर्वच रंगांची माणसाला दैनंदिन जीवनात नित्य नितांत गरज भासते. माणसाला रंग कळले पाहिजे. प्रसंग कोणता आणि तिथे कोणता रंग हे गणित ज्याला जुळले त्याला जीवन कळले!


आकाशाची निळाई आणि एक तृतीयांश अथांग सागराची! विश्व व्यापक हा निळा रंग म्हणजे प्रेरणा, स्थैर्य, शहाणपणा आणि पावित्र्य! लाल-केशरी रंग रक्ताचा, उगवतीच्या सूर्य किरणांचा! त्याग, साहस, वीरता, शौर्य आणि सावधानता म्हणजे लाल-केशरी रंग! हिरवा रंग सृष्टीचा, पानांचा, प्रकाशसंश्लेषणासाठीचा महत्वपूर्ण रंग! संपूर्ण प्राणीमात्रांचे भरणपोषण करणारा असा हा हिरवा रंग! हिरवा म्हणजे पुनरुज्जीवन, नवीनता आणि अमरत्वाचा रंग! काळा रंग मातीचा, काळ्याकुट्ट ढगांचा ज्यातून संपूर्ण सृष्टी चिंबचिंब न्हाऊन निघते! माती म्हणजे सृजनता, मातृत्व आणि नावांकुर! काळा वर्ण कृष्णाचा, ज्या रंगाने लाखोंना वेड लावले आणि अजूनही हा काळा भुलवून टाकतो आहे! हाच काळा पाहून राधा बावरी झाली आणि

रंगात रंग तो श्यामरंग पाहण्या नजर भिरभिरते

ऐकुन तान विसरून भान ही वाट कुणाची बघते त्या सप्तसुरांच्या लाटेवरूनी साद ऐकुनी होई

राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी

असा गीत-संगीतातून सर्वांनाच मंत्रमुग्ध करणारा हा काळा रंग! कृष्णावर आणि त्याच्या वर्णावर अनेक लेखक-कवींनी भरभरून लिहिले आहे. एखाद्याचा वर्ण सावळा असेल त्याने फार वाईट वाटून घेऊ नये. उलट हाच एकमेव वर्ण आहे जो उन्हात आणि सावलीत सुद्धा बदलत नाही. शुभ्र धवल पांढरा रंग अवकाश पोकळीचा! संपूर्ण सृष्टी ज्या शुभ्र रंगाने व्यापली असून यात कोणताही रंग लगेच सामावून जातो असा हा पांढरा रंग! पांढरा रंग साधेपणा, स्वच्छता आणि पवित्रतेचं प्रतिक! असे हे काही रंग आहेत ज्यांच्यामुळे मानवी जगण्याला रंग आला. याच रंगांनी आपले जीवन रंगारंग करून टाकले. काही लोक एवढे प्रभावित झाले की; क्षणार्धात रंग बदलायला लागले! मित्रहो, कोणताच रंग कधी एका धर्माचा, जातीचा अथवा पंथाचा होऊच शकत नाही. सर्वांनाच सर्वच रंगाची गरज असते. कुणीही रंगात विभागला जाऊ शकत नाही. सगळे रंग सगळ्यांच्याच



जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. त्यासाठी संपूर्ण विश्वासमोर इंद्रधनुष्य हा सर्वच रंगांचे प्रतिनिधित्व करणारा सर्वांगसुंदर निसर्गाचे, एकतेचे द्योतक मानले जाते! या रंगांनी भल्याभल्यांना वेड लावले! श्री रंगाच्या रंगाने राधा बावरी झाली! पांडुरंगाच्या रंगाने तर लाखो लोक अक्षरशः वेडे झाले. याच रंगाने अनेकांना आपला संसार त्यागून समाजाचे ऋण फेडायला प्रवृत्त केले. त्यामुळेच संत चोखोबाराय महाराजांच्या सुविद्य पत्नी संत सोयराबाई

**अवघा रंग एक झाला। रंगि रंगला श्रीरंग ॥१॥**
**मी तूं पण गेले वायां। पाहतां पंढरीच्या राया॥२॥**

हा अभंग लिहून पंढरीच्या त्या काळ्या रंगाने इथे कशी क्रांती केली( ? ) हे थोडक्यात सांगून जातात. या रंगाने अठरापगड जातीतील लोकांना एकत्र आणण्याची महान क्रांती केली. जातीभेद, उच्च-नीचता संपवून टाकली. याच रंगाने लाखो लोक आकर्षित होऊन नियमित त्या काळ्या रंगाच्या दर्शनाला येऊन आपले जीवन कृतार्थ करून घेतात. घरोघर याच रंगाने आपले अधिष्ठान प्रतीष्टापित केले आहे. ही काळ्या रंगाने केलेली जगातील सर्वांत मोठी क्रांती म्हणणे वावगे ठरू नये!

सज्जनहो, आज रंगपंचमीचा पहिला दिवस म्हणजेच धुळवड! आजच्या दिवशी सर्वांनी एकमेकांना रंग लावून हा रंगीबेरंगी रंगांचा उत्सव साजरा करायचा आहे. एकमेकांविषयी मनात असलेले समज-गैरसमज-किल्मिष काढून टाकून एकमेकांना रंग लावायचा आहे. लहान मुलांसारखे बेधुंद होऊन पाच दिवस रंग पंचमी साजरी करायची आहे! हा रंगोत्सव सामाजिक, सांस्कृतिक, वैश्विक एकात्मतेचे प्रतिक असून डोंगर-माळावर लालबुंद निखाऱ्यासारख्या फुललेल्या पळसाकडे पाहून हा दिवस साजरा करायला हवा! अत्यंत दुर्गम भागात, सुविधेशिवाय फुललेला पळस हे संघर्षाचे, मैत्रीचे, जिव्हाळ्याचे प्रतिक आहे! रंगपंचमी-धुळवडीतून आपण सामाजिक एकोपा आणि पळसाप्रमाणे कोणत्याही खडतर प्रसंगाला सामोरे जाण्याची आंतरिक शक्ती स्वतःमध्ये निर्माण करूयात! आज माणसांमधला संवाद कमी होत आहे. सिमेंटच्या भिंतीत राहून आणि सिमेंटच्याच रोडवर चालून माणसं सिमेंट सारखी टणक, शुष्क आणि भावनाशुन्य होत आहेत! अक्षरशः मातीचा स्पर्श दुर्मिळ झाला आहे. माती माणसाला स्वतःत सामावून घेते. त्यासाठी नेहमी आपले पाय मातीवर असले पाहिजे. जीवनातील शुष्कता, बेरंग, एकाकीपणा, अहंकार, राग, द्वेष, मत्सर इत्यादी मानवी हृदयाला घातक बाबींना आजच्या दिवशी हद्दपार करून, व्यसनांना आळा घालून आपले जीवन निर्मळ पाण्यासारखे शुद्ध करूयात आणि साजरी करूयात रंगारंग रंगपंचमी!

# होलिया में उडे रे गुलाल...!!



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र.: ९८६०२७६२४१

आधुनिक केसरी

**सखी री बडे भाग से फागुन आयो री ॥१॥फागुन आयो...फागुन आयो...फागुन आयो री सखी री बडे भाग से फागुन आयो री... शरद ऋतू संपून वसंत ऋतू प्रारंभ होतो. या जीर्ण झालेल्या सृष्टीच्या शक्तीचे नूतनीकरण म्हणजे वसंतोत्सव. धर्मसिंधू या ग्रंथाच्या मते, फाल्गुन वद्य प्रतिपदेला वसंतोत्सव सुरु होतो.त्यावेळी फाल्गुनातील होळी येते सप्तसुरांना छेडीत .ऋतूराज वसंताला आपल्या रंगतदार मिठीत वेढीत.झाडा-झुडपांना नवी कोवळी पालवी फुटण्याचा हा अलबेला उत्सव. रंगोत्सवात आपल्या भगव्या रंगाची बेभानहोऊन मुक्तहस्ते उधळण करणारा पळस फुलला असून काटेसावरही बहरली आहे कांचनची गुलाबी फुले शृंगारात भर घालत असून निसर्गाचा हा रंगोत्सव मनाला मोहनी घालतो.**

वसंतऋतूच्या आगमनाबरोबर निसर्ग रंगपंचमी खेळायला सुरुवात करतो. लाल हिरवा पिवळा निळा नारंगी गुलाबी रंगांची उधळण करतो. पळस, पांगारा यांची फुले पाण्यामधे भिजवुन तो रंग दुसऱ्या दिवशी खेळायची अनेक खेडेगावात प्रथा आहे.रंगपंचमी हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. पुराणकथेनुसार भगवान शंकराने फाल्गुन पौर्णिमेला आपल्या तिसऱ्या डोळ्याच्या अग्नीतून मदनाला जाळले होते. त्यानंतर त्याला अनंगरूपाने पुन्हा जिवंत केले. मदनाला पुन्हा जीवन मिळाल्याचा आनंद व्यक्त करणे हा देखिल या मागचा उद्देश असावा.खरे पाहाता होळीची सुरुवात ही उत्तरभारतात झाल्याचा उल्लेख पुराणात आढळतो."धम्मपद"नावाच्या ग्रंथात याचा उल्लेख"मुखो का मेला"असा आहे."जैमिनीय पूर्वमीमांसा"या ग्रंथात होळीवर संपूर्ण रसभरीत वर्णन केलं आहे.आजही होळी हा गीतप्रकार उत्तरेकडील मथुरा,वृंदावन या भागात मोठ्या प्रमाणात गायला जातो. सध्या आपल्या पृथ्वीवर पर्यावरण धोक्यात आलेले आहे,याचा विचार करुन होळी ही आपल्या परिसरातील कच-याची पेटवा. आपल्या मनातील षड्विकारांची,लोभ,मत्सर आणि अनिष्ट प्रथेची तसेच संकुचित मनोवृत्तीची होळी पेटवा.आत्तापर्यंत आपल्याकडून कळत-नकळत झालेल्या चुका मान्य करून निसर्ग नियम पाळत पर्यावरणपूरक उत्सव साजरे करुयात. पण याकरिता परंपरेमध्ये बदल करण्याची मानसिकता मात्र जरूर असावी लागते.कृत्रिम रासायनिक रंग वापरून होळी खेळणे हे प्रदूषणात वाढ करणारे आहे. हे रंग पर्यावरणास घातक तर असतातच शिवाय आपल्या आरोग्यासदेखील धोकादायक ठरतात.याचा कोणीच विचार करत नाही.होळी व रंगपंचमीकरिता पर्यावरणपूरक कोरडे रंग तयार करण्याच्या निरनिराळ्या पद्धती आहेत,त्याचा अवलंब करायला हवा. भारतीय चित्रपटसृष्टीत रंगपंचमीवर अनेक अजरामर गाणी आहेत.व्ही. शांताराम यांनी काढलेल्या नवरंग ह्या अजरामर चित्रपटात काही गीते होळी, रंगपंचमी यावर आधारीत आहेत. अतिशय सुमधुर चाल, चपखल शब्द व स्वर्गीय स्वररचना....!

**'अरे जा रे हट नटखट...', 'रंग दे रे...'** केवळ अप्रतिम! रंग बरसे...बुरा ना मानो होली है... म्हटल्याशिवाय आपली रंगपंचमीच साजरी होत नाही. चला तर मग पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरी करूया! दरवर्षी विषमुक्त रंगोत्सव साजरा करून आपल्या प्रकृतीची व निसर्गाची हानी टाळूया!!

**पहली किरण को देखकर**
**स्मित अधरोंपर युं बोली**
**उषा की लाली मे डूबी**
**रंग उडाती आयी होली||१|**



# महिला क्रिकेटला संजीवनी देणारी लीग



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**इंडीयन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलला या वर्षी पंधरा वर्ष पूर्ण होतील. २००८ साली जेंव्हा आयपीएलची संकल्पना मांडण्यात आली तेंव्हा अनेकांनी आयपीएल यशस्वी होईल का ? असा प्रश्न विचारला होता त्याला कारणही तसेच होते भारतात अशाप्रकारची लीग पहिल्यांदाच खेळवली जाणार होती विदेशात विशेषतः युरोप आणि आफ्रिकेत फुटबॉल लीग होतात मात्र क्रिकेटची लीग ती ही भारतात हे अनेकांना पचनी पडत नव्हते त्यामुळे अनेकांनी त्यावर टीका केली होती आज पंधरा वर्षांनी मात्र हीच आयपीएल क्रीडा क्षेत्रातील मोठा ब्रँड बनली आहे.**

जगातील सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक महागडी लीग म्हणून आयपीलची ओळख आहे. जगभरातील क्रिकेटपटू आयपीएलमध्ये खेळायला मिळावे म्हणून देव पाण्यात घालून बसतात. आयपीएलमुळे क्रिकेटपटू मालामाल झाले. बीसीसीआय जगातील सर्वात श्रीमंत बोर्ड बनले इतकेच नाही तर आयपीएलमुळे क्रिकेटची लोकप्रियता कैक पटीने वाढली. आयपीएलमुळेच भारताला अनेक दिग्गज खेळाडू गवसले. आज भारताचे प्रतिनिधित्व करणारे सर्वच खेळाडू आयपीएलमुळेच भारतीय संघात आले. गाव खेड्यातील खेळाडूंना आयपीलने रातोरात स्टार बनवले. आयपीएलमुळे क्रिकेटची लोकप्रियता गगनाला भिडली त्यामुळेच मागील काही वर्षांपासून मागणी होऊ लागली की पुरुषांप्रमाणेच महिलांचीही प्रीमियर लीग स्पर्धा व्हावी. भारतातील महिला क्रिकेटला अजूनही म्हणावी तशी लोकप्रियता लाभली नाही. खेळाडूंना हव्या असणाऱ्या सुविधा मिळत नाही. महिला क्रिकेटला लोकप्रिय करायचे असेल आणि देशातील तरुण मुलींना क्रिकेटकडे आकर्षित करायची असेल तर महिलांची आयपीएल असावी अशी मागणी अनेक आजी माजी महिला खेळाडूंनी बीसीसीआयकडे केली होती. पुरुष संघातील खेळाडूंनीही महिला खेळाडूंच्या या मागणीला पाठिंबा दिला होता अखेर बीसीसीआयने यावर्षीपासून महिलांची प्रीमियर लीग खेळण्याची घोषणा केली आणि गेल्या कित्येक वर्षांची प्रतीक्षा संपली. ४ मार्च पासूनच महिलांच्या आयपीएलला अर्थात वुनन्स प्रीमियर लीग ( wpl ) सुरवात झाली आहे. काही दिवसांपूर्वीच यासाठी खेळाडूंचा लिलाव झाला होता.स्मृती मानधना, हरमाणप्रित कौर यासारख्या स्टार खेळाडूंना संघात घेण्यासाठी संघ मालकांनी कोट्यवधी रुपये मोजले. या लिगमुळे काही खेळाडू कोट्याधीश तर काही खेळाडू लक्षाधीश बनले. या लिगमुळे महिला क्रिकेटपटू मालामाल झालेच मात्र केवळ पैसे मिळवणे इतक्या पुरतीच ही लीग मर्यादित नाही या लीगचे अनेक फायदे आहेत. या लीगच्या निमित्ताने ऑस्ट्रेलिया, इंग्लड, आफ्रिका, वेस्ट इंडिज या देशातील दिग्गज खेळाडू भारतात खेळताना दिसतील. जगभरातील हे दिग्गज खेळाडू भारतीय खेळाडूंसोबत एक संघात खेळतील त्यामुळे या खेळाडूंच्या अनुभवाचा लाभ भारतातील युवा खेळाडूंना मिळेल. त्यांच्याकडून त्यांना शिकायला मिळेल. प्रत्येक संघात गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणासाठी स्वतंत्र आणि तज्ज्ञ प्रशिक्षक असतील त्यामुळे खेळाडूंना खेळातील बारकावे समजून घेण्यास आणि आपल्या खेळात सुधारणा करण्यास संधी मिळेल. ही लीग स्टार स्पोर्ट या लोकप्रिय वाहिनीवर दाखवली जाणार असल्याने कोट्यवधी भारतीय आणि जगभरातील क्रिकेटप्रेमी घरबसल्या पाहतील त्यामुळे महिला क्रिकेटची लोकप्रियता वाढेल. या लिगमधील सामने महिला आणि मुलींना मोफत पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे त्यामुळे महिला आणि मुली मैदानात सामने पाहण्यासाठी येतील त्यामुळे या मुली क्रिकेटकडे आकर्षित होतील. मैदानावरील सामने पाहून अनेक मुली क्रिकेटमध्ये करियर करण्याचा निश्चय करतील. खेळाडूंनाही मैदानात सर्वोत्तम कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल. या लीगमध्ये खेळणाऱ्या मुलींना आपले कौशल्य दाखवण्याची संधी या निमित्ताने मिळेल. यातीलच काही मुली पुढे जाऊन भारताचे प्रतिनिधित्व करतील. एकूणच महिला क्रिकेटला लोकप्रिय करण्यात आणि महिला खेळाडूंचे नशीब पालटवण्यासाठी ही लीग खूप महत्वाची ठरणार आहे.

# लेखकांना पाठबळ देण्याची गरज

## मानसिंह पवार : हिप्पोक्रेटिसची शपथचे प्रकाशन संपन्न



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** नवलेखक हे सातत्याने लेखन करीत असतात मात्र त्यांना योग्य ती संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांचे लेखन समाजासमोर येत नाही. कन्नड येथे सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने नवलेखकांना व्यासपीठ मिळऊन देऊ. डॉ. ऊर्मिला चाकुरकर यांच्या हिप्पोक्रेटिसची शपथ या कादंबरीचे प्रकाशन कन्नड येथे होत आहे ही आमच्यासाठी कौतुकाची बाब आहे. नवलेखकांना पाठबळ दिले तर ते उद्याचे प्रभावी लेखक होतील. त्यामुळे नवलेखकांना पाठबळ देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उद्योजक तथा वाचनालयाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांनी केले. ता. ( ४ ) येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात पुस्तक प्रकाशन समारंभ त्यांच्या हस्ते संपन्न झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते तर ज्येष्ठ पत्रकार व लेखक प्रविण बर्दापूरकर, सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. अंबादास सगट यांची भाष्यकार म्हणून व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रारंभी लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख, साहित्यिक व संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. लेखिका व कवयित्री डॉ. ऊर्मिला चाकुरकर यांनी कादंबरीची निर्मिती प्रक्रिया व लेखनाविषयीची भूमिका विशद केली. यावेळी पुस्तकावर भाष्य करतांना प्रविण बर्दापूरकर म्हणाले की, या कादंबरीतील अनुभव अतिशय सच्चे आहेत ते अनुभवच कादंबरी फॉर्म मध्ये डॉ. चाकुरकरांनी मांडले आहे. रुग्णांच्या मूळाशी जाऊन अनुभव प्रवाही व संवादी भाषेत अभिव्यक्त केले आहे. डॉक्टरांच्या आयुष्यात प्रत्येक क्षण नवा अनुभव देणारा असतो. मात्र सध्या वैद्यकीय व्यवसायाचं अधःपतन झालं आहे. बहुसंख्य डॉक्टर हिप्पोक्रेटिसची शपथ पाळणारे नाहीत असे मत व्यक्त केले. डॉ. अबादास सगट म्हणाले की, सामाजिक अभिसरणाची गरज म्हणून या पुस्तकाकडे पाहिले पाहिजे. सामाजिक अंगाने लिहिले गेलेले हे अनुभव आहे. ही कादंबरी प्रबोधन करते. डॉक्टरांनी माय व रुग्णांनी लेकरू झालं पाहिजे . सामाजिक चिंतन करून उपाय सांगणारी ही लेखिका आहे. स्त्री जिवनाचं भावविश्व वास्तवपणे त्यांनी मानवतावादी दृष्टिने मांडले आहे. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, वैद्यकिय क्षेत्रातील अनुभव लेखिकेने मांडले आहे रुग्ण व डॉक्टर यांचे नाते संपुष्टात येत आहे. या कादंबरीतून नव्याने वैद्यकिय व्यवसायात आलेल्यांना ही कादंबरी प्रेरणा देईल असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले तर डॉ. कारभारी भानुसे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी रामकृष्ण पवार, डॉ. रुपेश मोरे, संजय जाधव, प्रा. हुकुमचंद पवार, प्रा. संतोष देशमुख, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. कारभारी भानुसे यांनी विशेष प्रयत्न केले.




# डॉक्टराअभावी रुग्णांचे हाल

## संतप्त गावकऱ्यांनी ठोकले दवाखान्याला कुलूप

आधुनिक केसरी न्यूज

**विहामांडवा :** विहामांडवा ही ग्रामीणची मराठवाड्यातील सगळ्यात जुनी मोठी बाजारपेठ आहे, परंतु या बाजारपेठेमध्ये उपजिल्हा रुग्णालय असणे आवश्यक आहे.

येथे फक्त प्राथमिक आरोग्य केंद्र आहे आणि तेथेही अनेक दिवसांपासून कायमस्वरूपी एकही डॉक्टर नसल्याने रुग्णांचे अत्यंत हाल होत आहेत त्या कारणाने चिंचाळा, चोंडाळा, मिरखेडा, केकत जळगाव, आडवे उंचेगाव, सालवडगाव, खंडाळा, वडजी, ब्रह्मगाव हिंगनी, इंदेगाव, अंबड व गेवराई तालुक्याच्या परिसरातील अनेक रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रात येत असतात. आजही सकाळी सात वाजल्यापासून अकरा वाजे पर्यंत अनेक रुग्ण येऊन गेले परंतु दवाखान्यामध्ये एकही डॉक्टर नसल्याने रुग्णांनी अक्षरशः दवाखान्याला कुलूप लावले.

अकरा वाजेपर्यंत डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे कुलुप लावल्या नंतर 11:35 ला डॉक्टर जोशी आले रुग्णांची तपासणी केली, मागील एक महिन्यापासून प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी धानोरकर हे कायमस्वरूपी दोन डॉक्टर देतो म्हणतात पण देत नसल्याने व्यापारी महासंघ अध्यक्ष राजेंद्र पन्हाळकर, पत्रकार शब्बीर भाई शेख, समाजसेवक पत्रकार नितीन ब्रह्मराक्षस, पत्रकार आरेफ भाई शेख यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामीण भागातील रुग्णांनी दवाखान्यास कुलूप ठोकले.

# औरंगाबादच्या जनमित्राचा केंद्र सरकारतर्फे सन्मान

## दिल्लीतही लाईनमन दिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दिल्ली येथे शनिवारी केंद्र सरकारच्या वतीने व टाटा पॉवर डीडीएलच्या सहकार्याने झालेल्या लाईनमन दिवस समारंभात महावितरणचे जनमित्र व अभियंत्यांचा सन्मान करण्यात आला. ऊर्जा मंत्रालयाच्या अधिपत्याखालील केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष घनश्याम प्रसाद व टाटा पॉवर डीडीएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश श्रीनिवासन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. औरंगाबादमधील महावितरणच्या औरंगपुरा शाखेचे सहायक अभियंता सतीश अधाने व वरिष्ठ तंत्रज्ञ भगवान सहाणे, पुणे प्रादेशिक विभागातून सहायक अभियंता केदार कुलकर्णी, तंत्रज्ञ प्रदीप पवार, नागपूर प्रादेशिक विभागातून कनिष्ठ अभियंता अक्षय बनसोडे, प्रधान तंत्रज्ञ महेंद्र गोमासे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी या कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली. 'सेवा, सुरक्षा व स्वाभिमान' अशी संकल्पना असलेल्या या समारंभात देशभरातील 20 हून अधिक राज्यांतील वीज वितरण कंपन्यांच्या निवडक 100 जनमित्रांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी वीज वितरण कंपन्यांतील अभियंते व जनमित्रांच्या कामाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. घराघरात प्रकाश पोचवणारे जनमित्र हे खरे नायक असल्याचे उद्गार मान्यवरांनी काढले.







# भाविकांनी प्रत्येक सणातून सांस्कृतिक वारसा जोपासवा : महंत रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** भारतीय संस्कृतीमध्ये अनेक पारंपारिक सण उत्सव साजरी करण्याची परंपरा आहे यामध्ये होलिका वास्तव हा खूप जुना मानव जीवनाशी निगडित पारंपारिक सण आहे यामध्ये दृष्ट शक्तीचा नाश होऊन आध्यात्मिक शक्ती जोपासावी प्रत्येक क्षणा मागे आपल्या पुरोजांनी काहीतरी हेतू ठेवून सण उत्सव सुरू केलेत ते पुढील पिढीने जो असावे असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी गोदावरी धाम श्रीक्षेत्र सरला बेट येथे होलिकापूजन प्रसंगी केले. आज गोदावरीधाम बेट सरला येथे पारंपारिक पद्धतीने पिठाधिश महंत रामगिरीजी महाराज यांनी होलीका पुजन केले.

होळी करा नकारात्मक विचारांची, होळी करा व्यसनांची, होळी करा वैर भावनेची, वाईटाची होळी करा, चांगल्याची साधू संतांची संगत धरा. देव देश धर्म यांची सेवा करा असे प्रतिपादन करून भाविकांना होळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विश्वस्त मधुकर महाराज यांच्यासह विद्यार्थी भाविक भक्त उपस्थित होते.

# आ. फारुख शाह यांच्या प्रयत्नांना मोठे यश..!

## विभागीय कार्यालयासाठी २१ व फायर स्टेशन, अग्निशमन बंब, रुग्णवाहिकेसाठी १३ कोटी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिनांक 30 जुलै रोजी नाशिक विभागीय आढावा बैठक मालेगाव येथील तालुका क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. या बैठकीत धुळे जिल्ह्याचे महत्त्वाचा प्रश्न म्हणजे एमआयडीसीसाठी रावेर येथील सुमारे ९८ हेक्टर अतिरिक्त जमीन तत्काळ अधिग्रहित करण्याचे जाहीर करण्यात आले होते.यासाठी एमआयडीसीसाठी अतिरिक्त जमीन अधिग्रहित करण्यासाठी धुळे शहराचे आमदार फारुख शाह हे सुरुवातीपासून आग्रही होते. यापूर्वी वनमंत्र्यांच्या दालनात बैठक घेऊन जमीन अधिग्रहणाचा मुद्दा पुढे केला होता विभागीय आढावा बैठकीत मुख्यमंत्री महोदयांनी जमीन अधिग्रहण करण्याचे जाहीर करून धुळे शहराच्या विकासाचा मुद्दा सोडविला होता. तसेच धुळे शहरात मोठे उदयोग धंदे येत आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यासाठी स्वतंत्र कार्यालयाची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत दोन - तीन जिल्ह्यांचा कार्यभार एकाच वास्तूतून केला जात आहे. त्यामुळे एकूणच कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याने. धुळे M.I.D.C. साठी स्वतंत्र व सुसज्ज विभागीय कार्यालय ईमारत बांधणेसाठी निधी उपलब्ध करून देणेत यावा. तसेच गेल्या काही दिवसांपूर्वी मधुर इंडस्ट्रीज आणि केशरानंद जिनिंगला प्रमाणात आग लागली होती. या ठिकाणी धुळे महानगरपालिकेतून अग्निशमन दलाच्या गाड्या बोलावल्या होत्या परंतु धुळे शहरातून एम. आय. डी. सी. कडे जाणारा रस्ता हा खूप जास्तीचा वर्दळीचा व शहरापासून १० किमी अंतराचा असल्यामुळे अग्निशमनची गाडी वेळेवर घटनास्थळी पोहचली नाही. परीणामी मोठ्या प्रमाणात उद्योजकांचे नुकसान



झाले. या घटनेमुळे फायर स्टेशनची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आमदार फारुख शाह यांनी आणून दिले होते. तसेच तसेच एम.आय.डी.सी. तील सर्व औद्योगिक संघटना मागील सात वर्षापासून व मी गेल्या वर्षभरापासून स्वतंत्र फायर स्टेशन होण्याकामी प्रयत्नशील आहोत. ऑगस्ट २०१६ मध्ये औद्योगिक संघटनांनी फायर सेस भरण्यास तयार असल्याचा ठराव केला. या ठरावाचे पत्र एमआयडीसी प्रशासनाला दिल्या नंतरही सहा वर्षाचा कालावधी उलटला असूनही फायर स्टेशन झाले नाही. तरी अश्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अवधान एम. आय. डी. सी. धुळे येथे स्वतंत्र फायर स्टेशन उभारण्यात यावे. या संदर्भात आ.फारुख शाह यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली होती.

त्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांनी मालेगाव येथील नाशिक विभागीय आढावा बैठकीत उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांना तत्काळ या विषयावर निर्णय घ्यावा असे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयासाठी २१ कोटी तसेच फायर स्टेशन इमारत, २ अग्निशमन बंब आणि एक रुग्णवाहिका यासाठी १३ कोटी मंजुर करण्यात आलेले आहे. यामुळे शहरातील एमआयडीसी चे उद्योजक यांनी आमदार फारुख शाह यांच्या कामाची प्रशंसा केली असून त्यांना धन्यवाद दिलेले आहेत.

# 'होम सेंटर' नसल्याने परीक्षार्थी विद्यार्थ्यांची तारांबळ!

## 'नेट' परीक्षेत नेटकेपणाचा अभाव; नांदेडच्या महाविद्यालयाचेही ढिसाळ नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** एनटीए या एजन्सीकडून सध्या राष्ट्रीय पातळीवरील 'नेट' या परीक्षा सुरू आहेत. मात्र, या परीक्षा घेत असताना नियोजनाचा मोठा अभाव असल्याचे दिसून येत असून, याचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना बसतो आहे. नेट परीक्षा या संगणकावर घेतल्या जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना आपापल्या जिल्ह्यात होम सेंटर दिले जाते. यंदा मात्र परीक्षेच्या अगदी तोंडावर विद्यार्थ्यांना इतर जिल्ह्यातील परीक्षा सेंटर दिल्याने विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडाली. दरम्यान, नांदेड येथील ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस या सेंटरवरील ढिसाळ नियोजनाचा विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागला. युजीसी आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सी ( एनटीए ) यांच्या मार्फत प्राध्यापक पात्रता परीक्षा अर्थात नेट ही राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा वर्षभरात दोनदा आयोजित केली जाते. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात या अंतर्गत विविध विषयांच्या परीक्षा सध्या संपन्न होत आहेत. या परीक्षा संगणकावर ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जातात. परीक्षा संगणकावर होत असल्याने विद्यार्थ्यांना यापूर्वीच्या परीक्षा आपल्या जिल्ह्यात अर्थात होम सेंटरवरती देता आल्या. मात्र, यंदा अचानकपणे इतर जिल्ह्यात परीक्षा सेंटर देण्यात आल्याने विद्यार्थ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील सेंटर देण्यात आल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांना परीक्षा देता आल्या नाहीत. बऱ्याच परीक्षार्थी महिलांना त्यांच्या अडचणींमुळे या परिक्षेपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे यापुढे आपापल्या जिल्ह्यातील होम सेंटर परीक्षेसाठी पूर्वीप्रमाणे कायम ठेवावे, अशी मागणी आता विद्यार्थ्यांकडून जोर धरू लागली आहे.

**नांदेडच्या 'ग्रामीण' महाविद्यालयाचे ढिसाळ नियोजन !**

या परीक्षेचे केंद्र नांदेड येथील विष्णुपुरी भागातील ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस या महाविद्यालयाला देण्यात आले . या परीक्षा केंद्रावर शनिवार दि . 4 मार्च रोजी सकाळ सत्रात 9 ते 12 या वेळेत परीक्षा असल्याने आणि सकाळी 7 .30 वाजताची रिपोर्टिंग असल्याने विद्यार्थी तिथे गेले . मात्र, सकाळी 7 .30 वाजता एकही कर्मचारी त्या केंद्रावर हजर नसल्याने निदर्शनास आले . एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी देखील कमी मनुष्यबळ असल्याने ताटकळत थांबावे लागले . या केंद्रावर नियोजनाचे बारा वाजल्याचे दिसून आले . पर्यवेक्षक सकाळी 9 पर्यंत हजर नव्हते . त्यामुळे परीक्षार्थी आणि उपस्थित कर्मचारी यांच्यात बाचाबाची देखील झाली . या केंद्राच्या ढिसाळ कारभारामुळे परीक्षा 9 वाजता सुरू न होता 9 वाजून 13 मिनिटांनी सुरू झाली . त्यामुळे भविष्यात हे केंद्र देण्यात येऊ नये अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे .

**'सेट-नेट' म्हणजे पैसे उकळण्याचे साधन**

दरवर्षी युजीसी आणि एनटीए यांच्यातर्फे वर्षातून दोनदा नेट परीक्षा तर पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडून राज्य पातळीवरील सेट ही परीक्षा वर्षातून एकदा घेतली जाते . विद्यार्थ्यांकडून हजारो रुपये फिस उकळली जाते . मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून प्राध्यापक भरती प्रक्रिया बंद आहे . त्यामुळे हजारो विद्यार्थी पात्र असून देखील अक्षरश : तुटपुंज्या मानधनवर घड्याळी तासिका प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत . जर प्राध्यापक भरतीच करायची नसेल तर या परीक्षा कशासाठी ? असा प्रश्न आता संतापाने विद्यार्थी विचारत आहेत .

# वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पशु, वन्यप्राण्यांची प्रकृती चिंताजनक

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत चालेलेली असताना तापमान देखील उच्चांक गाठत आहेत, कित्येक ठिकाणी विहिरी तळ गाठू लागले असल्यामुळे शेतकऱ्यांची पिके देखील धोक्यात आलेली आहेत. शेतामध्ये पाणी नसल्याने असंख्य पक्षी पाण्याच्या शोधात मनुष्यवस्ती तसेच घरांकडे धाव घेत आहेत, परंतु सध्याच्या उन्हाच्या तीव्रतेमुळे काही पक्षांचा पाण्या अभावी मृत्यू होत आहे. तर काही पक्षी पाण्याच्या कमतरतेने आजारी पडल्याचे पक्षी मित्रांना आढळून येत आहेत. सध्या अनेक ठिकाणी नागरिक जागरूक झालेले असल्याने पक्षांना पाण्याची व्यवस्था करत आहेत. मात्र निसर्ग राखण्यासाठी पक्षांची मोठी गरज आहे पक्षी टिकले तरच निसर्ग टिकणार असल्याने पक्षांच्या संवर्धनासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे. उन्हाची तीव्रता वाढत असताना नागरिकांना देखील उष्णतेचा सामना करावा लागत असताना अनेक ठिकाणी पक्षांचे व वन्यप्राण्यांचे पाण्या अभावी हाल होत असल्याचे दिसत असून काही पक्षांचे बळी जात आहे परंतु नागरिकांनी सध्या पक्षांना व प्राण्यांच्या साठी दाणा पाणी ठेवण्याचे आवाहन पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनचे अध्यक्ष मा श्री सुशील दादा विभुते, उपअध्यक्ष शंकरआबा वाडकर यांनी केले आहे. नागरिकांनी शक्य तेथे पक्षांसाठी वन्यप्राण्यांन साठी पाण्याची व्यवस्था करत मुठभर धान्य पक्षांना टाकणे गरजेचे आहे , पावसाचे दिवस सुरु होईपर्यंत नागरिकांनी पक्षांना पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे असून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरासमोर तसेच घराच्या छतावर शेतातील झाडांवर पाणी ठेवावे व वाढत्या तापमान मुळे आपल्या आजूबाजूला सावली साठी व पाण्या साठी साप पण आपल्या घराजवळ येतात. तर त्याना कोणती हि ईजा न करता आपल्या जवळील वन विभाग यांना संपर्क करा किंवा टोल फ्री नंबर १९२६ ला कॉल करा किंवा आपल्या जवळील सर्पमित्र, प्राणीमित्राला संपर्क करा असे आवाहन देखील पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनचे सदस्य सर्परक्षक विशाल शिंदे, विलास धोंगडे, श्रीकांत (सोन्या) खेडकर, सनी कडके, विनायक मोहिते, संतोष पाटील, दीपक जाधव यांनी केले आहे.



# चिंता हेच दुःखाचे कारण

## संजय महाराज कदम यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**शातातराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील तलवाडा येथे आखःड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी गावातुन दिंडी टाळ मृदुगाच्या वारकऱ्यांच्या वेशभूषा करुन डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन भजनात तल्लीन झालेल्या महिला या मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात हरी नामाचा जयघोष करण्यात आला. काल्याच्या किरर्तन प्रसंगी संजय महाराज कदम लाखणीकर म्हणाले. तुम्हाला जिवनांत सुख व समाधान हवे आसेल तर परमार्थाची कास धराविच लागेल प्रतेक मनुष्य हा सुखासाठी धडधडत असतो परंतु सुख आणि सामाधान हवे आसेल तर ते फक्त संतांच्या संगतीत व ईश्वराच्या सेवेत आहे. कलयुग, आधुनिक युगात परमार्थ बरोबर माणुसकी मोठा धर्म आहे प्रपंच संसार सोबत आध्यात्मीकाची जोड आधुनिक युगात आवश्यक असून आजच्या धकधकीच्या जिवन व त्यातचिंताहेचदुखाचे कारण असल्याने संतसंघा शिवाय जिवनात आनंद नसल्याचे मत संजय कदम लाखणीकर यांनी व्यक्त केले. पुढे बोलताना संजय कदम यांनी सांगीतले की, संसारिक ठेवा हे संपणारे धन आहे मात्र पारमार्थिक धन चिरकाल टिकणारे असून पारमार्थिक धनाने पिढी संस्कारित केली जाते, भाववृत्तीने केलेला संतसंघ हा सफल ठरतो. भक्तीभाव तिथे देव असून परमार्थाने मन,बुद्धी अंतकरण शुद्ध होते. दोषमुक्तीसाठी परमार्थ करा मानवाचे मन हे अती चंचल आहे आणी चंचल मनहेचदुखाचे खरे कारण आहे मनाची चंचलता कमी करण्याचे सर्वात मोठे साधन आध्यात्मीकाचा मार्गा अवलंब करुन संतसंघ परमार्थ शिवाय मानव जिवनात आनंदच नसल्याचे मत व्यक्त केले. सोमदे यांनी आध्यत्म, परमार्थ, वारकरी सांप्रदाय संस्कार आशा विविध विषयांवर प्रकाश टाकला. गणेश महाराज वाकलेकर गणेश महाराज जाधव. पुरुषोत्तम महाराज चांगदेव जाधव शाईनाय महाराज कदम सिताराम जाधव, आशोक महाराज, वैभव महाराज सर्वानंदगिरी महाराज सभापती भागीनाथ मगर उपसभापती राजेंद्र मगर भाऊसाहेब जनार्दन मगर दादाभाऊ बोडखे दत्तु मगर किशोर मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित भाविकांना राजेंद्र मगर, अशोक मर, गोकुळ सोनवणे, काशिनाथ शिंदे, योगेश मगर, रामदास मगर, बाळासाहेब मगर यांच्यातर्फे महाप्रसाद देण्यात आला.



# फुलंब्री शहरात 48 कोटी पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

## खा. रावसाहेब दानवे व आ. हरिभाऊ बागडे यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात काल दिनांक 4 मार्च रोजी पाणी पुरवठा योजनेच्या भुमिपुजनेचा उद्घाटन सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार रावसाहेब दानवे, व आमदार हरिभाऊ बागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर औरंगाबाद जिल्हा परिषदेचे माजी सदस्या अनुराधा चव्हाण, जितेंद्र जैस्वाल, दिल्ली येथील इफकोचे माजी संचालक त्र्यंबकराव शिरसाट, भाजपा तालुकाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट, पंचायत समितीच्या सदस्या ऐश्वर्या गाडेकर यांच्या सह आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार हरिभाऊ बागडे यांनी सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचावा. अटल पेन्शन योजनेचा फायदा घ्यावा. आता सर्वच जण म्हतारे होणार आहे मी पण म्हतारा झालो. पाणी पुरवठा योजनेकरीता शासनाकडून निधी उपलब्ध झाला आहे.याचा पुरेपूर फायदा शहरातील नागरिकांना होणार आहे. तसेच फुलंब्री तालुक्यात 35 40 कोटी रुपयांचे रस्त्याचे कामे झाली.

व खासदार रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, केंद्रात व राज्यात आपलं सरकार आलं व फुलंब्री शहरात बदल झाले. औरंगाबाद ते जळगाव महामार्गाचा 2400 कोटी रुपये खर्च करून रस्ता झाला आहे. तसेच जालना लोकसभा मतदारसंघात 6 हजार कोटी रुपयांची विकासकामे झाली. विजेसाठी 750 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. व आता पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी 48 कोटी 19 लाख रुपयांचा निधी दिला आहे. येणाऱ्या काळातील विकास कामांसाठी आणखी निधी देऊ असे ते म्हणाले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आचारसंहिता असल्याने भूमिपूजनाची वाट बघावी लागली. फुलंब्री नगरपंचायतअंतर्गत प्रत्येक वाड्या-वस्त्यांवर सिमेंट रस्ते केले. राज्यात फुलंब्री नगरपंचायत सातव्या क्रमांकावर आली आहे.

# यशस्विनी महिला सहकारी पतसंस्थेचे कर्मचारी प्रशिक्षण शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**पिसादेवी :** संभाजीनगर जिल्हा यशस्विनी पतसंस्था शाखा पिसादेवी येथे आज दिनांक 05.3.2023 रोजी रविवार सकाळी 9:30 वाजता संस्थेचे कार्यालय येथे संस्थेच्या अध्यक्षा सौ सविता अधाने पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले या प्रशिक्षण वर्गासाठी संस्थेचे सर्व कर्मचारी अधिकारी वर्ग उपस्थीत होते. संस्थेमध्ये काम करत असताना कर्मचारी व अधिकारी वर्ग यांना येणाऱ्या अडचणीवर कशी मात करावी या विषयावर संस्थेच्या अध्यक्ष्या तसेच संस्थापक अध्यक्ष देविदास आधने पाटील यांनी मार्गदर्शन केले.

सहकारी पतसंस्थेमध्ये कर्मचाऱ्यांनी कायद्याच्या अंतर्गत राहून काम केले पाहिजे. सहकारी संस्थेमध्ये कर्मचाऱ्यांनी उपविधी वाचन केली पाहिजे. त्यातून आपणास कायद्याची माहिती मिळते सहकारी पतसंस्था ही कायदा 1960 कलम 1961 नुसार चालते त्यातील वेळोवेळीहोणारे बदल याची माहिती देण्यस संस्था वेळोवेळी प्रशिक्षण देऊन करते प्रत्येक ग्राहक हा संस्थेचा सभासद असला पाहिजे सभासद असणाऱ्याच्या ठेवी आपण स्वीकारू शकतो असे प्रशिक्षण वर्गात सांगण्यात आले. संस्थेमधील अधिकारी हा संस्थेचा घटक असून संस्था नफा किंवा तोटा यासाठी तेवढाच जबाबदार असतो. देशभरात महिलांसाठी आदर्श सन्मान म्हणून 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो तरी या उद्देशाने संस्थेच्या अध्यक्ष्या यांनी महिला कर्मचारी यांचा मान सन्मान वाढवून पुष्पगुछ देऊन गुण गौरव केला व चार दिवसीय जागतिक महिला दिना निमित्त महिलांचा सत्कार करण्यात आला यावरून असे दिसून येते की संस्थेमध्ये महिलांसाठी मान सन्मान देन्यास ही संस्था सर्व गुण संपन्न आहे महिला पतसंस्था असल्यामुळे महिलांना अधिक प्रधान्य देतात असे संस्थेचे अध्यक्षा सविता अधाने आपल्या एक दिवशीय प्रशिक्षण शिबिरात बोलताना म्हणाल्या मी एक महिला आहे. महिलाही आज कोणत्याही क्षेत्रात मागे राहता कामा नाही आणि राहणार ही नाही अशी मी महिलांसाठी भुमिका ठेवील औरंगाबाद जिल्हा यशस्वीनी महिला ही संस्था नावाने ओळखली गेली पाहिजे असा या संस्थेने एक प्रोजेक्ट हाती घेतला.

# अध्यात्म, वैश्विक तत्वज्ञान भारताला विश्वगुरू बनवेल

## केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांचे प्रतिपादन; साधू-संत, महंतांच्या सत्संगाने वातावरण भक्तिमय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आध्यात्म हीच भारताची खरी शक्ती होती. गेल्या काही वर्षांत तिची ओळख पुन्हा जनतेला होत आहे. या शक्तीचे संवर्धन करून देशाला जगात महत्त्वाच्या स्थानी स्थापित करण्याचे स्वप्न साकार केले पाहिजे. अध्यात्म, वैश्विक तत्वज्ञान आणि संत-महात्मात्यांचा शुभाशिर्वाद भारताला विश्वगुरू बनवण्याचे स्वप्न साकार करेल," असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी केले. साधू-संत, महंतांच्या सान्निध्याने वातावरण अध्यात्मिक व भक्तिमय झाले होते. महामंडलेश्वर शिवानंद महाराज प्रतिष्ठान व मातोश्री विजयाताई नाईक सामाजिक फाउंडेशनच्या पुढाकारातून महाराष्ट्राच्या इतिहासात पुण्यात पहिल्यांदाच झालेल्या साधू-संत-महंत संमेलन व दर्शन सोहळ्यात श्रीपाद नाईक बोलत होते. वर्धमान सांस्कृतिक भवनमध्ये झालेल्या या संमेलनावेळी हरियाणा येथील महंत श्रीश्रीश्री १००८ कालिदास महाराज, पंचदशनाम जुना आखाड्याचे महामंत्री श्रीश्रीश्री १००८ अशोक महाराज, हरिद्वार येथील महामंडलेश्वर श्रीश्रीश्री १००८ प्रेमगिरी महाराज, श्रीश्रीश्री १००८ हरिगिरी महाराज, किन्नर जुना आखाड्याच्या महामंडलेश्वर श्रीश्रीश्री १००८ दीपाताई राजमाने (जगवाली), महामंडलेश्वर शिवानंद महाराज यांच्यासह अनेक मठाधिपती, नागा साधू, वाचासिद्धी संत, महात्मे उपस्थित होते.

संमेलनात विश्वशांती महायज्ञ, सुमधुर सुंदरकांडाचे प्रस्तुतीकरण, भजन व प्रवचन, मुक्त भांडारा, गोमाता पूजन करण्यात आले. हरिद्वारवरून आणलेल्या एक हजार लीटर गंगाजलमध्ये हा महाप्रसाद तयार करण्यात आला. गुरुवर्य प्रकाशभाऊ शिंदे निर्मित भारतातील एकमेव जागृत अकरा मारुती मठाचा आणि मठाधिपती पदाचा ग्रहण सोहळा झाला. मातोश्री विजयाताई नाईक सामाजिक राष्ट्रीय फाउंडेशनचे लोकार्पण व संकेतस्थळाचे उद्घाटन झाले.

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी अतुल नरहरी भोसले, राहुल गोसावी मित्र परिवार, महामंडलेश्वर शिवानंद महाराज प्रतिष्ठान, सर्वात्मक महारुद्र परिवार, मैत्री प्रतिष्ठान, शिवाजी करंजुले, नंदकिशोर शहाडे, ललित तींडे, भरत मिसाळ, डॉ. इंद्रजित यादव, ॲड. महेंद्र दलालकर, निलेश आवटे, चिमाजी आहेर, पंकज महाले यांनी परिश्रम घेतले. श्रीपाद नाईक म्हणाले, "छोट्या चुकीमुळे आपला देश पारतंत्र्यात गेला. त्यावेळी देशातील संत समाज आणि आध्यात्मिक



शक्तीमुळेच देश पुन्हा उभा राहिला. संतांच्या आशिर्वादांमुळे सत्य आणि नीतीमत्तेच्या मार्गावर चालत राहिलेला हा देश सातत्याने प्रगतिपथावर आहे. देशाला भविष्यात अग्रस्थानी नेण्यासाठी देखील हीच आध्यात्मिक, धार्मिक शक्ती साहाय्यक ठरेल. साधू-संतांची परंपरा आपण जगली व जागवली पाहिजे. 'उरलो उपकारापुरता' हे जगण्याचे तत्वज्ञान घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या राजकारणाला नवी दिशा देत आहेत. साधू-संतांचे आशीर्वाद व मार्गदर्शन त्यांना लाभत आहे. साधू-संतांच्या शरणागतीत आणि मार्गदर्शनात आपल्या जीवनाचे समाधान, विश्वाचे कल्याण होणार आहे. कालिदास महाराज म्हणाले, "काही वर्षांपूर्वीपर्यंत प्रभू श्री राम मंदिराचा मुद्दा वादात होता. तो प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौशल्याने मार्गी लावला. गंगा स्वच्छता अभियान चांगल्या पद्धतीने राबविले जात आहे. आता केंद्र सरकारने गोवंश संरक्षण आणि संवर्धनावर लक्ष्य केंद्रित केले पाहिजे. गोवंश असेल तर देश टिकेल आणि गोवंश असेल तर भारताला वैश्विक महाशक्ती होण्यापासून कोणीच रोखू शकणार नाही. मठाधिपती पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर गुरुवर्य प्रकाश शिंदे म्हणाले, "देशभरातून आलेल्या महंतांचे आशीर्वाद घेऊन त्यांच्या पवित्र उपस्थितीत मठाधिपती पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. हा माझा पुनर्जन्म झाल्याची अनुभूती झाली आहे. लवकरच नगर रस्त्यावरील ११ मारुती जागृत मठ उभारणार आहे. अध्यात्मिक ऊर्जेने हा नवा प्रवास जबाबदारीने पुढे नेण्याचा प्रयत्न करणार आहे."

# आंबेडकरी गझलचा आरंभबिंदू वामनदादा कर्डक

## संमेलनाध्यक्ष प्रमोद वाळके 'युगंधर' यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** वामनदादांची गीतरचना अभ्यासली तर बाबासाहेबांची चळवळ,वामनदादांची गीते आणि गझलरचना यांचे संमीलन झाले आहे असे दिसते. यालाच इंग्रजीत फ्युजन असे म्हणतात. बाबासाहेबांनी धर्माने गुलाम केलेल्या मनात मुक्तीचे स्फुलिंग पेटवून ऊर्जानिर्मिती केली. या ऊर्जेने मानवमुक्तीसाठी क्रांती रूप धारण केले. बाबासाहेबांच्या चळवळीत ऊर्जा आणि क्रांती यांचे संमीलन झाले होते. तसेच बाबासाहेबांची चळवळ आणि वामनदादांची गीत-गझलरचना यांचे संमीलन झाले आहे. या संमीलनातच आंबेडकरवाद आहे. आंबेडकरवादात सर्वकल्याणाचा विचार असतो. त्यामुळे आंबेडकरवादावर अधिष्ठित काव्य लेखन करणारे आणि १९३८ पासून गझल लेखन करणारे वामनदादा हेच आंबेडकरी गझलचे आरंभबिंदू असल्याचे प्रतिपादन प्रमोद वाळके यांनी केले . ते अमरावती येथे आयोजित अ. भा.आंबेडकरी



साहित्य आणि संस्कृती महामंडळाच्या आंबेडकरी गझल संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर संमेलनाचे उदघाटक डॉ. इकबाल मिन्ने, स्वागताध्यक्ष ज्ञानेश्वर रोकडे, प्रमुख अतिथी अशोक बुरबुरे, डॉ.सीमा मेश्राम , नंदकिशोर दामोदर आणि महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे उपस्थित होते. आंबेडकरी चळवळीत साहित्य संमेलने महत्वाची भूमिका बजावतात अ. भा. आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळाची भूमिका मांडतांना महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेला सांस्कृतिक संघर्ष प्रखर व्हावा यासाठी आणि आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीत वैचारिक शिस्त अबाधित राहावी यासाठी साहित्य संमेलने महत्वाची भूमिका बजावतात. साहित्य संमेलने ही केवळ संवादासाठी नव्हे तर मुक्त संवादासाठी असतात. सरकारी मदतीच्या भरवश्यावर आयोजित होणाऱ्या संमेलनांवर घोषित / अघोषित मर्यादा येतात. संमेलनात कुणी कसं व्यक्त व्हावं हे जर सरकार ठरवत असेल तर अशा संमेलनांना काहीही अर्थ उरत नाही. मग संमेलने ही केवळ सोपस्कार बनून राहतात. समकाळात ब्राम्हो- भांडवली प्रवृत्तीनी संपूर्ण साहित्य-व्यवहारच नियंत्रित केला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अघोषित बंदी लादलेली आहे. अशा आणीबाणीच्या काळात आंबेडकरी लेखक, कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विचारमंथन करावे यासाठी आम्ही 'आंबेडकरी गझल संमेलन' हा मंच उपलबध करून दिला आहे.

# डॉ. संतूजी रामजी लाड यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि. 4 मार्च वार शनिवार रोजी सावळदबारा येथे खाटीक गल्ली डॉ संतुजी लाड यांची 182 जयंती साजरी करण्यात आली खाटीक समाजाच्या वतीने सत्यशोधक समाजाचे अग्रदूत, महामानव डॉ संतूजी रामजी लाड यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन माजी सरपंच स्वातीताई भाऊराव कोलते व सरपंच भागवत जाधव टिटवी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी उपस्थित मान्यवर नांदातांडा सरपंच मोरसिंग चव्हाण,टिटवी सरपंच भागवत जाधव,उपसरपंच लव राठोड उपसरपंच, उपसरपंच मो. आरिफ मो.लुखमान,भाऊराव कोलते, मुकुंदा मानकर चेअरमन,विष्णू चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, पोलीस पाटील विलास कुल्ली,प्रा. जीवन कोलते ,मनोहर जगताप, दीपक मानकर, ईश्वर भुसारे, रामचंद्र चिमणकर, नामदेव गोडंबे, बेला आप्पा, एकनाथ सपाटे, राजू दांडगे, ईश्वर कोळपे, शरीफ तडवी, संदीप सूर्यवंशी, पत्रकार सुनील चोरमले, दीपक बुढाळ, सुभाष खराटे, शंकर खराटे, भोकरे सर, काशीराम खराटे, किसन रावळकर, नारायण माकोडे, भगवान माकोडे, रामा खराटे, शामराव रावळकर, विजू रावळकर, शांताराम खराटे, सुनील माकोडे, कृष्णा माकोडे,विलास रावळकर, किशोर रावळकर, अमोल रावळकर, सागर रावळकर, अक्षय खराटे, गणेश खराटे, गजानन खेडकर व महिला, ग्रामस्थ उपस्थित यांनी सर्वांनी डॉ संतूजी रामजी लाड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पैठणमधून सर्रास अवैध वाळू उपसा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महसूल व पोलिसांच्या आशीर्वादाने गेल्या कित्येक दिवसापासुन गोदावरी नदीतून अवैध वाळू उपसा सर्रासपणे चालू आहे. ना टेंडर, ना लिलाव तरीही रोज पैठण येथील गोदावरी नदीपात्रातून शेकडो ब्रॉस वाळू उपसा होत आहे. तहसीलचे वाळूविरोधी पथक कागदावरच असून, रात्रभर अवैध वाळू उपसा केला जात आहे. रात्रभर हायवा, पिकअप वाहनांसह वाळू विक्री होत आहे. वाळूविरोधी पथकाने केलेल्या दुर्लक्षामुळे, पैठण, दादेगाव, मायगाव, हिरडपुरी या ठिकाणाहून वाळू उपसा सुरू आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्राची चाळणी होऊन ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. याबाबत काही पोलीस अधिकारी व महसूलचे कर्मचारी यात सामिल असुन चिरीमिरी घेवून वाळू उपसा करणारास अभय देत असल्याची चर्चा पैठण शहरात आहे.



# शौचालयाचे बांधकाम तत्काळ थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरीला जागेला लागून असलेल्या सरकारी रोडलगत अवैधपणे होत असलेले शौचालयाचे बांधकाम तात्काळ थांबवण्यात यावे अशा आशयाची तक्रार सागर झनके यांनी ६ मार्च रोजी दादुलगाव ग्रामपंचायतचे ग्रामसेवक सरपंच यांचेकडे केली आहे. उत्तम सापुर्डा झनके यांचे घर हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याच्या बाजूला असून माणेगाव - आडोळ रोडच्या पंधरा ते सोळा पुट अंतरावर आहे. गेल्या पंन्नास वर्षापासून तेथे वास्तव्य करून राहत असून,ते त्यांची स्वताच्या मालकीच्या जागा आहे. ते रहायला आलेत तेव्हा पासून त्यांच्या न्हानीचे पाणी व जाण्याची वहिवाट त्यांच्या घराला लागून असलेल्या सरकारी जागेतून आहे.आजरोजी राजेश प्रकाष रणीत रा :- गौलखेड या व्यक्तीने त्या जागेवर अवैधपणे संडास बाथरूमचा मोठा गंड्डा खोदला असून सदर व्यक्ती त्या ठिकाणी संडास बाथरूम बांधत आहे.सदर संडास बाथरूम सरकारी जागेवर असून त्या लगतच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे.त्या समोरील जागेवरच गावातील सार्वजनिक कार्यक्रम होतात.त्यामुळे त्या ठिकाणी होत असलेले संडास बाथरूम चे काम थांबवण्यात यावे.

त्यामुळे सदर संडास बांथरूमचे काम तात्काळ बंद करूण भविष्यात त्या जागेवर सदर व्यक्तीने कुठलेच बांधकाम करू नये,अन्यथा न्याय मिळेप्रयंत विधायक मार्गाने पूढील लढा लढावा लागेल...अन्यथा आमरण उपोषन सुद्धा करण्यात येईल...अशा प्रकारची तक्रार ग्रामपंचायतीला दिलेली आहे.सदर तक्रारीच्या प्रतीलीपी गटविकास अधिकारी जळगाव जामोद,सहाय्यक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जळगाव जा,पोलीस स्टेशन जळगाव जामोद यांना दिल्या आहेत.

# मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्या होणार कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर व सावळदबारा परिसरात



होळी व धुलीवंदनाच्या दिवशी मद्यप्राशन करून भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्या चालकविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल यासाठी फर्दापूरात विविध ठिकाणी पोलीस पथक तैनात करण्यात येणार आहेत अशी माहिती फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि भरत मोरे यांनी सावळदबारा पोलीस ठाण्यात शनिवारी सायंकाळी आयोजित केलेल्या शांतता समिती च्या बैठकीत दिली. होळी व धूलिवंदन सण शांततेत साजरा करावा, मिरवणुकीत कुणीही मद्यप्राशन करणार नाही याची काळजी आयोजकांनी घ्यावी असे आवाहन सपोनि भरत मोरे यांनी केले. मद्यपी वाहनचालक, स्टंटबाजी करताना आढळून आल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल असा इशाराहि त्यांनी दिला आहे. या शांतता कमेटीची बैठक मधे नेते, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, बिट जमादार मिरखाँ तडवी, शिवदास गोपाळ व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# तोरणाळा ग्रामपंचायत देत आहे साथीच्या आजारांना आमंत्रण; नागरिक त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील तोरणाळा येथे गावाबाहेर रस्त्याला लागूनच गावाला पाणीपुरवठा करणारी मेन पाईपलाईन एक ते दीड महिन्यांपासून फुटलेली आहे तरी या पाईपलाईन कडे ग्रामपंचायत दुर्लक्ष का करीत आहे असा सवाल जनतेमधून उठवला जात आहे कारण गावाबाहेर असलेल्या आरोग्य उपकेंद्राजवळ ज्या ठिकाणी पाईपलाईन फुटलेली आहे त्या ठिकाणी लंपीच्या आजाराने दगावलेली गुरेढोरे पुरण्यात आलेली असून आता त्याच ठिकाणी गटारी सारखे मोठे डाबर साचून गावातील सुनाट फिरणारी जनावरे याच ठिकाणी पाणी पितात तसेच हेच घाण पाणी पाईपलाईनच्या द्वारे गावामध्ये पोहोचविले जाते पण या दुर्दैवी अवस्थेकडे गेल्या दीड महिन्यांपासून कुणाचेही लक्ष का नाही सरकारी यंत्रणा झोपलेली आहे का ? ग्रामपंचायत जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे का ? आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना पाणी तपासणीसाठी वेळ मिळत नाही का ? आशा हलगर्जीपणामुळे व काम चुकारपणामुळे जर गावात कुठल्याही आजाराची साथ लागू झाली तर याला जबाबदार कोण ? असे अनेक प्रश्न जनतेमधून केले जात आहे त्यामुळे गावातील जनतेच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे ग्रामपंचायतीचीच जबाबदारी आहे आणि जर ग्रामपंचायत हेतू पुरस्कार अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करीत असेल तर यांना जनतेशी काहीच घेणेदेणे नाही असं यातून स्पष्ट होत आहे म्हणून वरिष्ठ अधिकारी व प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन तोरणाळा गावाचे धोक्यात येणारे आरोग्य तात्काळ पाईपलाईन दुरुस्त करून थांबवावे अशी सुद्धा मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.





# जेहुर सर्कलमध्ये ठाकरे गटाला खिंडार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील सहानगाव तसेच जेहुर सर्कल मधील कार्यकत्यांनी छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा रोहयो व फलोत्पादन मंत्री संदीपानजी भुमरे , शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, शिवसेना विभाग प्रमुख सोमनाथ जाधव यांच्या उपस्थितीत सोनाली योगेश धाटबळे यांच्यासह सहानगांव येथील प्रविन धाटबळे, रोहीणी धाटबळे, जयश्री धाटबळे,उज्वला धाटबळे, सुनील धाटबळे,नवनाथ काळे, तुकाराम धाटबळे, विनायक धाटबळे, डॉ.सोनाजी धाटबळे, गोरख धाटबळे. रोहिला येथील सरपंच ज्ञानेश्वर गायकवाड,संताराम पवार,राहुल डोखळे,संभाजी पवार, संदीप राउत यांच्यासह तर कार्यकर्ते.निपानीचे माजी सरपंच प्रतापराव सुर्यवंशी यांच्यासह निपाणी येथील कार्यकर्ते. विटा येथील अप्पासाहेब शिंदे, वाल्मिक खैरनार, अनिल कोरडे, अतुल पवार, आबासाहेब भोजने, अनिल निकम, तुकाराम भोजने, संतोष खैरनार,जगदिश भोजने, मनोज पेंढारे, नीलेश थोरात,पद्माकर कोरडे,वैभव निकम. जेहुर येथील कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

# पो.नि. दीपरतन गायकवाड यांच्या बदलीने सहकाऱ्यांना अश्रू अनावर

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**माळशिरस :** पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष व गुन्हेगारांचा कर्दनकाळ बनलेले पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांची अकलूज येथे बदली झाली असून माळशिरस येथे राजेंद्र टाकणे यांची नेमणूक करण्यात आली आहे. राजेंद्र टाकणे हे आज किंवा उद्या सोमवार



दिनांक 6 मार्च रोजी माळशिरस पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी यांच्या दि. 4 मार्च रोजी बदल्या झाल्या असल्याचे सोलापूर जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे यांनी जाहीर केले आहे. माळशिरस येथील पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांची बदली अकलूज पोलीस स्टेशन येथे झाली आहे. माळशिरस पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणार्या सर्व गावातील हातभट्टी दारुबंद करुन तात्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या आपरेशन परिवर्तन या मोहीमेची काटेकोर अंमलबजावणी करुन अनेकांचे अवैध्य धंद्याकडचे हात ओळवून उद्योग धंद्यात गुंतवले असल्याने ते चर्चेत आले होते.

# करडईचे काटे शरीराला टोचतात, तेल मात्र हृदयाचे आरोग्य जपते : भोळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पळसखेडा, टिटवी येथील शेतकरी करडई पिकाच्या टोचना या काट्यांच्या भितीने लागवडीला धजावत नाहीत परंतु 'करडई'चे काटे शरीराला टोचते; पण 'तेल' शरीरातील हृदयाचे आरोग्य जपते आसे मार्गदर्शन शेतीशाळा प्रशिक्षक तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ सोयगाव यांनी करडई पिकाच्या शेतीशाळेत पळसखेडा येथे केले.नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) अंतर्गत मौजे परिसरात दि ४ मार्च रोजी व तालुका कृषी अधिकारी एस. जी.वाघ व फर्दापूर मंडळ अधिकारी आर.जी.गुंडले यांच्या मार्गदर्शनाखाली करडई पिकाची पाचव्या वर्गाची शेतीशाळा प्रगतशील शेतकरी शेतकरी भागवत जाधव व माजी सभापती सांडू तडवी यांच्या शेतावर घेण्यात आली. या वेळी आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आसलेले पिक काढणी व काढणी पश्चाततंत्रज्ञाना विषयी माहिती देताना काढणी करताना पिकाचे बोंडे चांगले भरणे आवश्यक आहे दाणे भरल्याची खातरजमा करावी, साधारण पणे सदर पिक दिवसात काढणीला येते काढणी ही हार्वेस्टरच्या सहाय्याने करता येते. काढणी ही हाताने करावयाचे झाल्यास सकाळी लवकरकरावे, हातात हातमोजे घालावेत त्याचबरोबर काटे टोचनार नाहीत कमरेपर्यंत चा भाग झाकून राहील आसे पोत्यासारखे आच्छादनाचा वापर करावा, हार्वेस्टिंग चांगले वाळवून टक्के आर्द्रता राहिल ऐवढे वाळवावे पोत्यात भरून कोरड्या ठिकाणी ठेवावे कारण तेलबिया असल्यामुळे तेलाचा दर्जा चांगला मिळण्यासाठी काढणी पश्चात तंत्रज्ञान खूप महत्त्वाचे आहे.

ठरते आदी मार्गदर्शनात्मक चर्चा केली. या शेतीशाळेत महाराष्ट्र शासनाने कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी माजी सभापती सांडू तडवी, भागवत जाधव, संदीप जाधव, ताराचंद राठोड, मधुकर पोलिस पाटील, पोलिस पाटील ज्ञानेश्वर पाटील, संभाजी सपकाळ,अबाराव कोलते, आदी शेतकऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख, अमोल महाजन (बीटीएम), कृषी सहाय्यक बी.वाय,वायकर, अतुल पाटील कृषी पर्यवेक्षक, विजयसिंह राजपूत, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर उपस्थित होते. सध्या रबीच्या हंगामात करडई पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

सोयगाव तालुक्यात रब्बी हंगामातील करडई चे क्षेत्र वाढले असून तालुक्यातील रब्बी हंगामाचा विचार करता यंदा प्रथमच इतर पिकांच्या तुलनेत 'करडई पिकाचे क्षेत्र वाढल्याचे दिसत आहे . गेल्या आनेक वर्षापासून करडई हे पिक तालुक्यातून जिल्ह्यातून हद्दपार होते की काय ? अशी स्थिती निर्माण झाली होती . जसे की सूर्यफूल पिक आजघडीला जिल्ह्यात नामषेश झाल्याचे चित्र दिसत आहे .
**मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक सोयगाव**













**मुंबई : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी लोकसत्ता जिल्हा निर्देशांक कार्यक्रमात इंडियन एक्सप्रेस वृत्त समूहाचे कार्यकारी संचालक अनंत गोएंका, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री छगन भुजबळ,माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्या समवेत विविध विषयांवर चर्चा केली.**

# शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक न्याय विभागाची पुण्यात बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे आज पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्यायविभागाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आज पुणे झाली. या बैठकीचे आयोजन प्रदेश सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष माजी आमदार जयदेव गायकवाड यांनी केले होते. या बैठकीला अठरापगड जातीचे पदाधिकारी उपस्थित होते. वेगवेगळ्या समाजातील शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रश्न पवारसाहेबांनी ऐकून घेतले. त्यानंतर या समाजाच्या समस्या समजून घेण्यासाठी एक उपसमिती तयार करण्याची सूचना पवारसाहेबांनी दिली. या वेगवेगळ्या समाजाच्या समस्या राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी शरद पवार यांनी उपस्थितांना आश्वासन दिले. सदरच्या बैठकीला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्व प्रमुख कार्यकर्ते हजर होते. त्यामध्ये माजी आमदार जयदेव गायकवाड, राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे, पंडित कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, मच्छिंद्र भोसले,तुकाराम साळुंखे, गौतम कदम, शैलेंद्र जाधव, रमेश राक्षे, अंकल सोनवणे, अनंत कांबळे,अजय गायकवाड, लक्ष्मण सुरनर,विजय खंडाळे, गोरक्ष लोखंडे आदी मान्यवरांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.




# भाजपा सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे शेतमालाला भाव नाही

## भाजपा विरोधात लढण्यासाठी जे पक्ष येतील त्यांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

> शहरांची नावं बदलून शेतकऱ्यांचा, बेरोजगारांचा फायदा होत असेल, महागाई कमी होत असेल, लोकांचे प्रश्न सुटत असतील तर जरूर बदला पण भाजपा सरकार मानवी गरजांकडे दुर्लक्ष करुन जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याच्या मुद्द्यांना प्राधान्य देत आहे . यातून जातीय तणाव वाढत आहे, हिंदू-मुस्लीम वाद निर्माण करुन सामाजिक एकतेला तडा देण्याचे काम केले जात आहे . छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात असे वाद वाढवून काय मिळणार आहे ? देशात गरिबी वाढत चालली असून दुसरीकडे मुठभर लोक श्रीमंत होत आहेत, यातून सामाजिक विषमता वाढली आहे पण भाजपाला हे मुद्दे महत्वाचे वाटत नाहीत .

**मुंबई :** देशात २०१४ पासून लोकशाही व्यवस्था, संविधान, नियम कायदे पायदळी तुडवून मनमानी कारभार सुरु आहे. सर्व यंत्रणा मोदी सरकारने हातच्या बाहुल्या बनवल्या असून विरोधी पक्षांचा आवाज दडपण्यासाठी सत्तेचा वारेमाप गैरवापर केला जात आहे. लोकशाही, संविधान वाचवण्यासाठी काँग्रेस पक्षाने पुढाकार घेतलेला असून भाजपा विरोधात लढण्यासाठी जे पक्ष एकत्र येतील त्यांना बरोबर घेण्याची काँग्रेस पक्षाची भूमिका आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, देशातील सर्व स्वायत्त संस्थांमध्ये मोदी सरकारचा हस्तक्षेप वाढलेला आहे, न्याय व्यवस्थाही यातून सुटलेली नाही, निवडणूक आयोगाची स्थिती आपण पाहतच आहोत, सुप्रीम कोर्टाला त्यात लक्ष घालावे लागले, प्रशासकीय व्यवस्थेतही प्रचंड़ हस्तक्षेप केला जात आहे. देशातील सध्याची राजकीय परिस्थीती चिंताजनक आहे म्हणूनच लोकशाही व्यवस्था अबाधित रहावी, संविधान वाचले पाहिजे यासाठी काँग्रेस पक्षाने पुढाकार घेतला असून रायपूरमध्ये नुकत्याच झालेल्या महाधिवेशनात राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व खा. राहुल गांधी यांनी यासंदर्भात पक्षाची भूमिका मांडलेली आहे. भारतीय जनता पक्षाच्या विरोधात लढण्यासाठी जे राजकीय पक्ष बरोबर येतील त्यांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे.भारतीय जनता पक्ष शेतकरी विरोधी आहे हे आम्ही सातत्याने सांगत आहोत. मोदी सरकार असो वा राज्यातील भाजपाप्रणित शिंदे सरकार असो ही सरकारे शेतकरी हिताचे निर्णय घेत नाहीत. कांद्याला भाव नाही, धानाला भाव नाही, कापूस, सोयाबिनची अवस्थाही तीच आहे. शेतकऱ्यांच्या घरात कापूस पडून आहे, त्यामुळे कापसाला कीड लागते व त्यातून शेतकऱ्यांच्या आरोग्याचे प्रश्न उद्‌भवत आहेत. धान बाजारात आल्यावर किंमती कमी होतात व शेतकऱ्यांनी धान विकल्यानंतर आता जवळपास हजार रुपयांनी भाव वाढला आहे. कांदा, धान, कापूस, सोयाबीन, तूरदाळ या शेतमालाला भाव नसल्यामुळे शेतकरी संकटात आहे.

# सिसोदियांना २० मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सीबीआयने दिल्ली मद्य धोरण प्रकरणात आम आदमी पार्टीचे नेते मनीष सिसोदिया यांना दिल्लीच्या न्यायालयात हजर केले होते. सीबीआयने कोर्टाकडे मनिष सिसोदियांची रिमांड मागितली नाही. कोर्टाने यानंतर २० मार्चपर्यंत सिसोदियांना न्यायालयीन कोठडी सुनावली. सीबीआयने म्हटले की दिवसांमध्ये त्यांची चौकशी केली जाईल. गेल्या वेळी जेव्हा मनिष सिसोदियांना न्यायालयासमोर आणले गेले होते तेव्हा त्यांची रिमांड वाढवण्यात आली होती. मात्र न्यायालयापुढे सीबीआयने कुठलीही मागणी केलेली नाही. त्यामुळे मनीष सिसोदियांना २० मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान मनिष सिसोदियांना तुरुंगात औषधी, डायरी, पेन, चष्मा आणि भगवद्‌गीता ठेवण्याची संमती देण्यात आली आहे. तुरुंग प्रशासनाला त्याबद्दल कळवण्यात आले आहे. मनिष सिसोदियांनी आपल्याला विपश्यनेच्या कोठडीत ठेवण्यात यावे अशीही विनंती कोर्टाला केली. त्यावर तुरुंगांच्या नियमांनुसार विचार व्हावा असे न्यायाधीशांनी म्हटले आहे. सीबीआयने आम आदमी पार्टीचे नेते मनिष सिसोदिया यांना दिल्लीतल्या अबकारी धोरणाच्या प्रकरणात २६ फेब्रुवारीला अटक केली.

# वीज व गॅस दरवाढी विरोधात आम आदमी पार्टीचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**टेंभुर्णी :** आगोरच महागाईने त्रस्त असलेल्या जनतेला दिलासा देण्याऐवजी दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढवून सरकार जनतेची पिळवणूक करत आहे. यातच घरगुती गॅस सिलिंडर 50 रू व व्यावसायिक गॅस सिलिंडर 350 रुपयाने वाढवला आहे. तर अलीकडेच शासनाने घेतलेल्या वीज दर वाढ करण्याच्या निर्णयाच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.माढा तालुका आम आदमी पार्टी व सोलापूर युवा आघाडी चे वतीने माढा तहसील कार्यालयासमोर केंद्रातील व राज्यातील भाजप सरकारचा घोषणा देऊन निषेध करीत आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना आपचे जिल्हाध्यक्ष गगन गोडसे म्हणाले की दिल्ली, पंजाब मध्ये आम आदमी पार्टी चे सरकार आहे त्या ठिकाणी शेतकऱ्यांना दिवसा 12 तास मोफत वीज आहे. तसेच घरगुती 300 युनिट पर्यंत वीज मोफत आहे. त्या राज्यांना शक्य आहे. मग आपल्या महाराष्ट्रला पण हे शक्य आहे. शासनाने वरील राज्यांचा आदर्श घेऊन महाराष्ट्रातही अशा प्रकारचे जनहिताचे निर्णय घ्यावेत. तालुक्यात काही ठिकाणी वीज कनेक्शन तोडणी चालू आहे. ती तोडणी देखील थांबवावी.अन्यथा राज्यभर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी आपचे जिल्हाध्यक्ष गगन गोडसे सतीश लोंढे, योगेश शिंदे, प्रभाकर क्षीरसागर, महारुद्र तोडकर, विशाल देवकर, कुलदीप पाटील, विशाल शेंडे, रामदास फरड, योगेश नवले, नंदकुमार साळुंखे, विशाल सुळे, दीपक सुळे, संकेत सुतार, योगेश यादव,राहुल पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

